मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




उपसंपादक - श्री विलास गायकवाड • कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे • निवासी संपादक - श्री राकेश पाटील • सह संपादक - श्री मुकुंद कांबळे • महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे • कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

वर्ष : ३ | अंक : २५५ | गुरुवार, २८ मे २०२६ | किंमत : २ रु | पृष्ठ : ८ | RNI MAHMAR/2023/89514

# लोकनेते रामशेठ ठाकूर साहित्यिक आणि लोक कलावंतांमध्ये रमणारा लोकनेता - पानिपतकार विश्वास पाटील

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून कोकण मराठी साहित्य परिषदेला २५ लाखाची देणगी जाहीर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल(प्रतिनिधी):** साहित्यिक आणि लोककलावंतांमध्ये मनापासून रमणारे लोकनेते, असे गौरवोद्गार पानिपतकार तथा ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांनी पनवेल येथे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याविषयी काढले. कोकण मराठी साहित्य परिषद रायगड जिल्हा आणि नवीन पनवेल शाखेच्यावतीने लोकनेते,माजी खासदार तथा कोकण मराठी साहित्य परिषदेचे सल्लागार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त "एक कृतार्थ संध्याकाळ" या विशेष साहित्यिक कार्यक्रमाचे आयोजन पनवेलच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात करण्यात आले होते. त्याप्रसंगी प्रमुख मान्यवर म्हणून पानिपतकार विश्वास पाटील बोलत होते.







या कार्यक्रमास कोकण मराठी साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, लोकनेते रामशेठ ठाकूर, सौ.शकुंतला रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ कवी व चित्रपट निर्माते दिग्दर्शक रामदास फुटाणे,सुप्रसिद्ध ज्येष्ठ कवी अशोक नायगांवकर,कोकण मराठी साहित्य परिषदेच्या अध्यक्षा नमिता कीर, कोमसापचे कार्याध्यक्ष महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे उपाध्यक्ष डॉ.प्रदीप ढवळ,ज्येष्ठ साहित्यिक अरुण म्हात्रे, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, युवा नेते नगरसेवक परेशशेठ ठाकूर,महापौर नितीन पाटील, भाजपा नेते वाय. टी.देशमुख, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, पनवेल पंचायतीच्या सभापती रंजना वासकर, सुप्रसिद्ध गझलकार ए.के. शेख तसेच कोकण मराठी साहित्य परिषदेचे विश्वस्त प्रा.एल.बी. पाटील, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, पनवेल महानगरपालिकेचे सभागृह नेते प्रकाश बिनेदार,कोमसापचे रायगड जिल्हा अध्यक्ष संजय गुंजाळ,नवीन पनवेल कोमसापचे अध्यक्ष गणेश कोळी यांच्यासह लोकप्रतिनिधी, साहित्यिक आणि रसिक उपस्थित होते.

यापुढे बोलताना पानिपतकार विश्वास पाटील म्हणाले,तळ्यांनी आणि कमळांनी फुलून-उमलून आलेले गाव म्हणजे पनवेल आणि या पनवेल गावातील सुवर्णकमळ हे लोकनेते रामशेठ ठाकूर आहेत.निष्ठेने माणूस मोठा होतो,त्याचे कर्तुत्वही मोठे असते. लोकनेते रामशेठ ठाकूर हे गरिबीतून वर आलेत.आपल्या गरिबीचे नाद,निनाद,स्पंद आणि त्या हाका,ती जाणीव ही सगळी आपल्या हृदयात आहे,ती अशीच ठेवावी.गोरगरिबांच्या सेवेत नेहमी तुम्ही सहभागी होता,ही अशीच सेवा यापुढेही सुरू ठेवावी अशी त्यांनी सांगितले.

कोकण मराठी साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष मधु मंगेश कर्णिक यांनी आपल्या भाषणात, लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे कर्तृत्व,दातृत्व आणि नेतृत्व पाहता त्यांना लोकनेता नाही तर समाजनेता म्हटले पाहिजे. समाजाप्रती अशी माणसे निर्माण झाली पाहिजेत.ज्या समाजात मी जन्माला आलो त्या समाजाचे कल्याण झाले पाहिजे,त्या समाजाचे भवितव्य घडले पाहिजे ही आकांक्षा रामशेठ ठाकूर यांच्या मनामध्ये आहे असे सांगून रामशेठ ठाकूर यांना अमृतसर वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. सुप्रसिद्ध राजकीय व्यंगकवी रामदास फुटाणे यांनी आपल्या भाषणात,बहुजनांच्या मुलांनी, तरुणांनी कसा संघर्ष केला पाहिजे याचे उत्तम उदाहरण म्हणजे रामशेठ ठाकूर.पनवेलची महत्वाची ओळख म्हणजे रामशेठ ठाकूर. रामशेठ ठाकूर यांच्या स्वभावाची नम्रता आपण बाकी जणांनी स्वीकारली पाहिजे हा त्यांचा महत्त्वाचा गुण आहे असे त्यांनी सांगितले.

लोकनेते माजी खासदार कोकण मराठी साहित्य परिषदेचे सल्लागार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या भाषणात, साहित्य समाज घडवण्याचे काम करतो. साहित्यिक स्फूर्ती देतात, उभारी देतात. साहित्यिकांच्या शुभेच्छांमुळे निश्चितच माझे आयुष्य वाढेल. आयुष्यात गरिबी,श्रीमंती,कष्टाचे अनुभव मी पाहिले आहेत.रयत शिक्षण संस्थेमुळे संस्कार मिळाले. आपण प्रामाणिकपणे काम केले तर एक यशस्वी नागरिक होऊ शकतो. लोकांनी मला रामशेठ बनवले,पण मी अजूनही रामशेठ झालो नाही.पैसे कमवले पण वृत्तीने आणि भावनेने मी शेठ झालो नाही.साहित्यिकांमुळे मी कृतार्थ झालो अशी शेवटी त्यांनी सांगितले. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कोकण मराठी साहित्य परिषदेसाठी २५ लाखाची देणगी जाहीर केली.

यावेळी सुप्रसिद्ध कवी अशोक नायगावकर,अरुण म्हात्रे,कोकण मराठी साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ.प्रदीप ढवळ यांची भाषणे झाली.कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी यांनी संपादन केलेल्या लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवनप्रवासावरील ७५ कवितांचा लोकनेता या प्रातिनिधीक काव्यसंग्रहाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. काव्यश्री या शुभांगी म्हात्रे यांच्या काव्यसंग्रहाचे तसेच डॉ.शैलजा करोडे यांच्या मेंदीच्या पानावर या काव्यसंग्रहाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे अभिष्टचिंतन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी यांनी प्रास्ताविक केले तर आभार प्रदर्शन प्रा. चंद्रकांत मढवी यांनी मानले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुणाल रेगे यांनी केले.

---

## उरण वाहतूक शाखेच्या पोलीस अधिकारी व अंमलदारांचा आयएसए लॉजिस्टिक्स प्रा . लि . तर्फे सन्मान

**दैनिक युवक आधार**

**उरण शहर प्रतिनिधी सायली साळुंके** : उरण वाहतूक शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या अविरत मेहनतीची दखल घेऊन आयएसए लॉजिस्टिक्स प्रा. लि. तर्फे एक विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात आयएसए लॉजिस्टिकचे चेअरपर्सन संतोष शेट्टी, एचआर अभय वायकर व सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते.

सदर कार्यक्रमामध्ये आयएसए लॉजिस्टिकचे चेअरपर्सन संतोष शेट्टी यांनी उरण वाहतूक शाखेतील पोलीस अधिकारी अंमलदार अविरतपणे मेहनत घेऊन वाहतूक नियमन करून वाहतूक सुरळीत ठेवल्याबद्दल सर्व पोलीस अधिकारी अंमलदार यांचे गौरवोद्गार काढले. पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या समाजासाठीच्या




दिलेल्या निःस्वार्थ सेवेला सलाम करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

उरण वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल दहिफळे यांनी ISA लॉजिस्टिक्स प्रा. लि. तर्फे दिलेल्या सन्मानाबद्दल आभार व्यक्त केले. कार्यक्रमात उपस्थित असलेल्या सर्वांनी पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्या कार्याला सलाम केला आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्याची कामना केली.

---

## इंग्लिश स्पीकिंग ट्रेनिंगला विद्यार्थ्यांचा १००% उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**भंडारा भावेश धंधुकीया जिल्हा प्रतिनिधी** : आर्ट्स ऑफ लाईफ कोचिंग अकॅडमी मध्ये सुरू असलेल्या भविष्य समर ट्रेनिंग 2.0 या उन्हाळी प्रशिक्षणामध्ये भरपूर विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेला आहे. या समर ट्रेनिंग मध्ये भाषेला महत्त्व देत इंग्लिश स्पिकिंग ट्रेनिंग सुद्धा घेतली जात आहे. ही ट्रेनिंग आर्टस ऑफ लाइफ कोचिंग अकॅडमीचे संचालक श्री निहाल जी वालदे सर स्वतः विद्यार्थ्यांना देत आहेत.




इंग्रजी भाषेची भीती, इंग्रजी भाषेचा व्याकरण तसेच दैनंदिन जीवनामध्ये इंग्रजी भाषा कशी बोलायची त्याचा आत्मविश्वास या सर्व गोष्टी विद्यार्थ्यांना मिळावेत हेच या ट्रेनिंग चे उद्दिष्ट आहेत. विद्यार्थी खूप इच्छेने आणि उत्स्फूर्तपणे या ट्रेनिंग मध्ये सहभागी झाले आहेत आणि इंग्रजी भाषा बोलायला शिकायचंच हे ध्येय त्यांनी मनाशी गाठल आहे. श्री निहाल वालदे सर म्हणतात की इंग्रजी आपल्या भागातील विद्यार्थी यासाठी बोलू शकत नाही कारण तसा वातावरण आपल्या समाजातील लोकांनी तसेच घरा प्रत्येक घरामध्ये निर्माण होत नाही आणि जरी कोणी बोलायला गेलं तर त्याला हवे तसे प्रोत्साहन मिळत नाही. इंग्रजी जर कोणाला बोलायचं असेल त्यासाठी सर्वात जास्त महत्त्वाची गोष्ट अशी आहे की आपल्याला फक्त बोलायला सुरुवात करावी लागते. एकदा बोलणं सुरू केलं की हळूहळू आपल्या बोलण्यातील सर्व त्रुटी आणि सर्व प्रकारचे कमीपणा दूर होत जातात. आजच्या काळात भाषेचे ज्ञान आणि वेगवेगळ्या भाषा बोलता यावे हेच नवीन शैक्षणिक धोरणाचे पण म्हणणे आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून आणि विद्यार्थ्यांमध्ये इंग्रजी भाषेचा आत्मविश्वास रुजवण्याची तयारी आर्ट्स ऑफ लाइफ कोचिंग आपल्या भविष्य समर ट्रेनिंग 2.0 या उन्हाळी प्रशिक्षणाच्या माध्यमातून प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याचा प्रयत्न करत आहे. आर्ट्स ऑफ लाईफ कोचिंग अकॅडमी ला पुढील वाटचालीस शुभेच्छा.

---

## प्रामाणिक मीटरधारक अंधारात, आकडेबहाद्दर उजेडात!

## बाभूळगाव बुद्रुक येथे दिवसाढवळ्या वीज चोरी; महावितरणचे दुर्लक्ष

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सिल्लोड तालुक्यातील बाभूळगाव बुद्रुक येथे महावितरण कंपनीच्या कमालीच्या डोळेझाकपणामुळे एक अजब आणि संतापजनक प्रकार समोर आला आहे. गावात रीतसर जोडणी घेऊन नियमित बिल भरणारे प्रामाणिक मीटरधारक अंधाराचा सामना करत आहेत, तर दुसरीकडे उघड्या विद्युत तारांवर अवैधरित्या आकडे टाकणारे 'आकडेबहाद्दर' मात्र उजेडात न्हाऊन निघत आहेत. या उघड वीज चोरीमुळे प्रामाणिक ग्राहकांतून तीव्र संताप व्यक्त होत असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी यावर तातडीने कडक कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.बाभूळगाव बु. येथे बोटावर मोजण्याइतकेच नागरिक नियमित मीटर वापरतात, तर आकडेबहाद्दरांची संख्या



मोठी आहे. भरदिवसा मुख्य वाहिनीवर आकडे टाकून येथे सर्रास वीज चोरी केली जाते. यामुळे रोहित्रावर (डीपी) प्रचंड ताण येत असून, विजेचा दाब (व्होल्टेज) सतत कमी-जास्त होतो. परिणामी, घरातील महागडी विद्युत उपकरणे जळण्याचे प्रमाण वाढले आहे. तसेच डीपीचे फ्युज वारंवार उडणे, तांत्रिक बिघाड होणे आणि रोहित्रामध्ये स्फोट होऊन वीज गूल होण्याचे प्रकार रोजचेच झाले आहेत.

**नियमबाह्य 'स्मार्टगिरी'; ग्राहक त्रस्त!**

एका बाजूच्या तारेवरील फ्युज गेला, की हे आकडेबहाद्दर तत्काळ दुसऱ्या चालू असलेल्या फेजच्या तारेवर आपला आकडा सरकवून वीजपुरवठा सुरू करून घेतात. मात्र, मीटरधारकांना एकाच ठरलेल्या फेजवरून कनेक्शन असल्याने, त्यांना नाईलाजास्तव तासनतास अंधारात राहावे लागते. महावितरणचे बिल पूर्ण भरूनही या प्रामाणिक ग्राहकांना घरात डिझेल किंवा गोडतेलाचा दिवा लावून उजेड करावा लागत आहे. या आकडेधारकांवर स्थानिक महावितरण यंत्रणा एवढी मेहरबान का, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

**'एबी केबल' टाकण्याची आग्रही मागणी**

बाभूळगाव बु. येथील ही गंभीर समस्या सोडवण्यासाठी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या वीज चोरीकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. उघडपणे वीज चोरी करणाऱ्या आकडेबहाद्दरांवर कायदेशीर व दंडात्मक कारवाई करण्यात यावी. तसेच, गावातील उघड्या विद्युत तारा तातडीने काढून त्या ठिकाणी पूर्णपणे सुरक्षित व इन्सुलेटेड 'एबी केबल' टाकण्यात यावी, जेणेकरून आकडे टाकणे कायमचे बंद होईल, अशी आग्रही मागणी मीटरधारक व ग्रामस्थांनी केली आहे.

---

## सिल्लोड येथील शिवसेना भवनात त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांना अभिवादन



**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : सिल्लोड येथील आमदार अब्दुल सत्तार यांचे जनसंपर्क कार्यालय असलेल्या शिवसेना भवन येथे त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी माता रमाई यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून तालुका व शहर शिवसेनेच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले.या प्रसंगी उपनगराध्यक्ष विठ्ठल सपकाळ, शिवसेना उपजिल्हाप्रमुख किशोर अग्रवाल, नगरसेवक सिद्धेश्वर आहेर, सुधाकर गायकवाड, इम्रान शेख (गुड्डू), जितू आरके, शेख सलीम हुसेन यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच शिवसेना महिला आघाडीच्या दुर्गाबाई पवार, शकुंतलाबाई बनसोड, लताबाई जाधव यांच्यासह प्रभाकर पारधे, राजेश्वर आरके, मनोहर आरके, युवा सेनेचे शिवा टोम्पे, प्रवीण मिरकर, कृष्णा वाघ, अविनाश गंगावणे, दिलीप वाघ, फईम पठाण, सुनील बनसोड, अशोक राऊत, जगन्नाथ कुदळ, भावराव दुधे, शमीम शेख, महेश पाटील, विनोद आरके, संतोष आरके, ज्ञानेश्वर दांडगे, धम्मा दांडगे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# साईनाथ महाराजांमुळे लोकसेवेची प्रेरणा मिळते – आमदार राहुल पाटील यांचे प्रतिपादन

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूर प्रतिनिधी / सय्यद इसा** : माहूर गडावरील श्री आनंद दत्त धाम आश्रम येथे धोंड्याच्या महिन्यानिमित्त मोठ्या प्रमाणात महाप्रसाद महापंगतीचे आयोजन करण्यात आल्याने परभणीचे आमदार राहुल पाटील यांनी येथे भेट देऊन आदरणीय राष्ट्रसंत द भ प साईनाथ महाराज वसमतकर यांचे दर्शन घेत महाप्रसादाचा लाभ घेतला यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की मी वेळोवेळी श्री साईनाथ महाराजांची भेट घेऊन दर्शन घेत असतो त्यांच्या संगतीत राहिल्याने मला लोकसेवेचे प्रेरणा मिळते असे त्यांनी यावेळी सांगितलेमाहूर गडावरील श्री आनंदाचा धाम आश्रम येथे दरवर्षी धोंड्याच्या महिन्यात महानदान महाप्रसादाचे वितरण होत असते येथे महिन्याभरात लाखोच्या संख्येने भाविक भेट देऊन अन्नदानाचा लाभ घेत



असतात यामध्ये सर्व प्रकारचे लोकसेवक या ठिकाणी येऊन साईनाथ महाराजांच्या सप्तसुत्री कार्यक्रमाचा अनुभव घेत असतात ही बाब शासनाच्या कानी गेल्याने शासनाकडून आय.टी.आय.चे प्रमुख मार्गदर्शक ब्रँड अँबेसिडर म्हणून साईनाथ महाराजांची नेमणूक करण्यात आली असल्याने तसेच त्यांचे सप्त सुत्री कार्यक्रमाची व्याप्ती भारतातील अनेक राज्यात पोहोचलेली असल्याने आनंद दत्तधाम आश्रमात महिन्याभरात लाखोच्या संख्येने भावीक महाप्रसाद ग्रहण करणार आहेत

याची दखल घेऊन परभणीचे आमदार राहुल पाटील भेट दिली त्यांचे सह अरविंद काका देशमुख कृ ऊ बा स स परभणी बंडू नाना बिडकर सरपंच वाडी जिल्हा परभणी प्रल्हादराव देवडे सुनील भाऊ गुडघे दिनेश बोचरे बबनराव रोदळे नारायण जाधव एकनाथ राऊत मारुती शिंपले प्रकाश खापरे मधुकर शिंगुळे प्रभाकर संसारे भाऊराव पाटील हडसणीकर पुंडलिक हुंबे सुधीर जाधव यांचे सह माहूर शहरातील व परिसरातील मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस एस पाटील आभार प्रदर्शन विनोद भारती यांनी केले कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

# देशाची प्रगती सर्वात महत्वाची- लोकनेते रामशेठ ठाकूर

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी)** : भाजप देशाची विचारधारा घेऊन चालणारा पक्ष आहे. प्रथम देश, नंतर पक्ष आणि त्यानंतर स्वतः अशी विचारसरणी असून सर्वांसाठी देशाची प्रगती सर्वात महत्वाची आहे, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आज (दि. २७)येथे केले.




मुंबई गोवा महामार्गावर पनवेल तालुक्यातील शिरढोण गावाजवळ असलेल्या सुप्रसिद्ध अशा हॉटेल साईकृपेचे मालक आणि सामाजिक कार्यकर्ते जनार्दनशेठ वाकडीकर, जयेश वाकडीकर, हॉटेल एकवीराचे मालक श्यामशेठ वाकडीकर, मनोदय इंग्लिश स्कुलचे चेअरमन भगवान वाजेकर, महेश महाडिक, शंकर पवार, संतोष चौधरी, सुमित पवार, तुकाराम जळे, जितेंद्र जळे, अमर जळे, प्रविण म्हात्रे, चेतन कर्णेकर, दिनेश भोपी, यश भोपी, कृष्णा भोपी, रोशन महाडिक, जगदिश महाडिक, दीपक महाडिक, जयेश महाडिक, महेश हरिभाऊ महाडिक, पंढरीनाथ महाडिक, धनाजी चौधरी, अर्जुन भोपी, शरद भोपी, शरद भोपी, प्रविण भोपी, जनार्दन जळे, बाळाराम चौधरी, संतोष पाटील, राहुल पवार यांनी त्यांच्या अनेक समर्थकांसह भारतीय जनता पार्टीत जाहीर पक्ष प्रवेश केला. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी नगराध्यक्ष व ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत मार्केट यार्ड येथे झालेल्या या सोहळ्यास प्रमुख मान्यवर म्हणून ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, युवा नेते प्रितम म्हात्रे, पंचायत समिती सदस्य राजेंद्र पाटील, वाहतूक संघटनेचे प्रभुदास भोईर, ॲड. राहुल घरत, अतुल घरत, माजी जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर घरत, नगरसेवक विकास घरत, सरपंच राकेश गायकवाड, विश्वजित पाटील, माजी उपसरपंच प्रमोद कर्णेकर, विजय भोपी, श्याम पवार, अनंता भोपी, रोशन घरत, गिरीश मुकादम, गजानन घरत, राम वाजेकर, एकनाथ मुकादम, दत्ता मुकादम, मदन खारके, नारायण चौधरी, पांडुरंग चौधरी आदी पदाधिकारी आणि शिरढोण ग्रामस्थ उपस्थित होते.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुढे मार्गदर्शन करताना सांगितले कि, भारतीय जनता पक्ष हा केवळ निवडणूक लढवणारा पक्ष नसून राष्ट्रसेवेचे ध्येय घेऊन कार्य करणारी संघटना आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली देशाने विकास, आत्मनिर्भरता आणि जागतिक स्तरावर नवी ओळख निर्माण केली आहे. केंद्र सरकारच्या विविध योजनांमुळे सर्वसामान्य नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडून आला असून गरीब, शेतकरी, महिला, युवक आणि वंचित घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम सरकारने केले असल्याचे त्यांनी नमूद केले. देशाच्या प्रगतीमध्ये प्रत्येक कार्यकर्त्याची भूमिका महत्त्वाची असून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शासनाच्या योजना पोहोचविण्यासाठी कार्यकर्त्यांनी समर्पित भावनेने कार्य केले पाहिजे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य देत समाजसेवा आणि जनसंपर्काच्या माध्यमातून सर्वांनी एकजुटीने काम करावे, असेही ते म्हणाले. तसेच आज प्रवेश झाला आहे ते मंडळी आपल्या स्व:कर्तृत्वाने व्यवसायात यशस्वी झाले आहेत याचा मनापासून आनंद आहे, असेही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अधोरेखित केले.

# पनवेल पालिकेचा संतापजनक कारभार!

## महापुरुषांच्या जयंतीला बंदी, पण वडाळे तलावावर 'फॅशन शो'ला मूकसंमती

**दैनिक युवक आधार**

**पनवेल: वार्ताहर** : पनवेल महानगरपालिका प्रशासनाचा अत्यंत दुटप्पी आणि संतापजनक कारभार समोर आला आहे. ज्या वडाळे तलाव परिसरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महापुरुषांची जयंती साजरी करण्यासाठी पालिका प्रशासनाने नियमांचे बोट दाखवून परवानगी नाकारली, त्याच ठिकाणी काल १७ मे २०२६ एका खाजगी संस्थेने आयोजित केलेल्या महिला फॅशन शोला प्रशासनाने मूकसंमती दिल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. महापुरुषांच्या कार्यक्रमांना 'नो एन्ट्री' आणि फॅशन शोला 'रेड कार्पेट' दाखवणाऱ्या पनवेल पालिकेच्या जातीयवादी मानसिकतेविरोधात भीम अनुयायांनी प्रचंड संताप व्यक्त केला असून, दोषी अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी केली आहे.

**लोकप्रतिनिधींचा ठराव आयुक्तांनी गुंडाळला**

पनवेल महानगरपालिकेच्या विशेष सर्वसाधारण सभेत (२३/०३/२०२२, ठराव क्र. ४४२) तत्कालीन सभागृह नेते परेश ठाकूर यांनी वडाळे तलाव येथे राजकीय कार्यक्रम वगळता इतर खाजगी, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यास मान्यता देणारा ठराव मांडला होता. तत्कालीन महापौर कविता चौतमोल आणि संपूर्ण सभागृहाने या लोकहितैषी ठरावाला मंजुरी दिली होती.



मात्र, 'जागृती फाउंडेशन' या सामाजिक संस्थेने २१ मार्च २०२३ रोजी या ठिकाणी महापुरुषांची जयंती साजरी करण्यासाठी अर्ज केला असता, तत्कालीन आयुक्त गणेश देशमुख यांच्या सांगण्यावरून परवाना विभागाने "या ठिकाणी ज्येष्ठ नागरिक फिरण्यासाठी येतात, गर्दी असते," असे कारण देत परवानगी नाकारली.

**जयंती रोखण्यासाठी थेट नवा प्रशासकीय ठराव?**

जागृती फाउंडेशनने पुन्हा २६ मार्च २०२४ रोजी परवानगी मागितली असता, तत्कालीन प्रशासनाने लोकप्रतिनिधींनी मंजूर केलेला लोकप्रतिनिधींची,नगरसेवकांची मुदत संपताच जुना ठराव बाजूला सारून स्वतःच्या अधिकारात एक नवीन ठराव सर्वसाधारण प्रशासकीय सभा २०२३ ठराव क्रमांक ६७९ केला गेला . या नव्या ठरावाचा दाखला देत उपायुक्त मारुती गायकवाड यांनी या ठिकाणी कोणत्याही कार्यक्रमाला परवानगी दिली जाणार नाही, असे लेखी पत्र दिले. महापालिकेच्या महापौरांनी आणि नगरसेवकांनी संमत केलेला ठराव रद्द करून, महापुरुषांची जयंती रोखण्यासाठीच अधिकाऱ्यांनी ही प्रशासकीय मनमानी केल्याचा आरोप आता केला जात आहे.

> **आमचा कुठल्याही संस्थेला विरोध नाही ,वडाळे तलाव परिसर कोणत्याही अधिकाऱ्याची जहागीरदारी नाही ती सार्वजनिक मालमत्ता आहे पनवेल वासियांची आहे त्या ठिकाणी त्याच वापर आणि सार्वजनिक समाज हिताचे ,प्रबोधनाचे कार्यक्रम व्हावेत हि आमची मागणी आहे त्यामुळे सन्मानीय माजी महापौर कविता चौतमोल यांच्या कार्यकाळात माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी मांडलेला ठराव योग्य होत आणि आहे त्याच ठरावाची अंमलबजावणी करण्यात यावी ,महापुरुषांच्या जयंतीला विरोध करणाऱ्या प्रशासनातील मनुवाद्यांना सत्ताधारी पक्षाने आणि विरोधी पक्षाने चांगली अद्दल सभागृहात घडवावी**
>
> **निलेश सोनावणे**
> **अध्यक्ष जागृती फाऊंडेशन**
> **अध्यक्ष पनवेल शहर आयपीआय**

**महापुरुषांना दुय्यम स्थान, फॅशन शो ला प्राधान्य!**

सध्याचे आयुक्त मंगेश चितळे यांच्या कार्यकाळात तर पालिकेच्या दुटप्पीपणाचा कळस गाठला गेला आहे. महापुरुषांच्या जयंतीला पालिकेकडे नियमांची जंत्री तयार असते; मात्र १७ मे २०२६ रोजी याच वडाळे तलावावर एका संस्थेने महिलांचा फॅशन शो आयोजित केला असताना पालिका प्रशासनाने साफ 'बघ्याची भूमिका' घेतली. बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या या फॅशन शोवर कोणतीही कारवाई न करता प्रशासनाने त्याला अभय दिले.

**भीम अनुयायी आक्रमक; जातीयवादी अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी**

"महापालिकेच्या अधिकाऱ्यांची ही कृती महापुरुषांचा अवमान करणारी असून, समाजात धार्मिक तेढ आणि जातीवाद निर्माण करणारी आहे," असा घणाघाती आरोप भीम अनुयायांनी केला आहे. या प्रकरणातील दोषी अधिकारी आणि परवानगी नसताना सार्वजनिक ठिकाणी फॅशन शो आयोजित करणाऱ्या आयोजकांवर तात्काळ कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अन्यथा पालिका प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा नागरिकांनी व आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी दिला आहे.

# विठ्ठल आळी परिसरात कार अपघात; सुदैवाने जीवितहानी टळली

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी अनिकेत मोहित** : श्रीवर्धन शहरातील विठ्ठल आळी परिसरात आज एका कारचा अपघात झाल्याची घटना घडली. भरधाव वेगात असलेली कार चालकाचे नियंत्रण सुटल्याने रस्त्याच्या कडेला असलेल्या गटारात जाऊन पलटी झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.अपघातानंतर परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केले. अपघातात कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही.सदर परिसरातील रस्ता अरुंद असून बाजूला



संरक्षण भिंत नसल्याने अशा प्रकारचे अपघात होण्याची शक्यता कायम असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. संबंधित प्रशासनाने या ठिकाणी सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

# श्री.खरवली देवी मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याचे रुंदीकरण करुन कॉनक्रेटीकरन करावे

## नगरसेविका वेदिका पाटील यांची वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे पत्राद्वारे मागणी

**दैनिक युवक आधार**

**कल्याण रमेश राऊत ग्रामिण प्रतिनिधी** : ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीत जुना मुंब्रा - पनवेल रोडच्या लगत डोंगराच्या कुशीत श्री खरवली देवी मातेचे मंदिर वसलेले आहे या मंदिरात लाखो भाविक दरवर्षी दर्शनासाठी येत असतात मुंब्रा-पनवेल हायवे पासून ते मंदिर पायथ्यापर्यंत जाण्यासाठी येथे कच्च्या रस्त्यावरून भाविकांना गाड्या घेऊन जावे लागते हा रस्ता पूर्णपणे खड्डेमय व खडकाळ असल्यामुळे भाविकांना तसेच येथे राहणाऱ्या नागरिकांना ये - जा करण्यास भरपूर त्रास सहन करावा लागतो याच अनुषंगाने वार्ड क्रमांक २९मधील नगरसेविका सौ.वेदिका साहिल पाटील यांनी माजी आमदार श्री.सुभाष




भोईर यांच्या सोबत वनमंत्री श्री.गणेश नाईक यांची भेट घेऊन या रस्त्याचे रुंदीकरण आणि कॉंक्रिटीकरण लवकरात लवकर करावे अशी मागणी पत्राद्वारे केली आहे यावेळेस त्यांच्यासोबत श्री.बाळाराम गणपत पाटील आणि श्री.साहिल बाळाराम पाटील हे सुद्धा उपस्थित होते.

# दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया'चे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष महेंद्र मोरे यांचे निधन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल/प्रतिनिधी** : 'दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया' (भारतीय बौद्ध महासभा), महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष महेंद्र मोरे यांचे रविवार, २४ मे २०२६ रोजी मुंबईतील नानावटी हॉस्पिटलमध्ये अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सोमवार, २५ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता अमरधाम स्मशानभूमी येथे अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

महेंद्र मोरे यांच्या अंतिम दर्शनासाठी रायगड, रत्नागिरी, पुणे, नाशिक, मुंबई व ठाणे यांसह विविध जिल्ह्यांमधून 'दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया'चे कार्यकर्ते आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी रायगड जिल्हा 'समता सैनिक दला'च्या वतीने त्यांना मानवंदना देण्यात आली.



याप्रसंगी संस्थेचे महासचिव रमेश बनसोडे, केंद्रीय कोषाध्यक्ष खैरमोडे, रत्नागिरी जिल्हाध्यक्ष सि. ए. जाधव, महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष भिमराव बनसोडे, ठाणे जिल्हाध्यक्ष राजू केदारे, नाशिक जिल्हाध्यक्ष सुरेश आहिरे, पुणे जिल्हाध्यक्ष आणि , सरचिटणीस अभिमन्यू ओव्हाळ, पिंपरी-चिंचवडचे सरचिटणीस जगताप, मावळ तालुकाध्यक्ष अशोक मोरे, ज्येष्ठ मार्गदर्शक बी. एच. गायकवाड गुरुजी, पेणचे प्रज्ञासूर्य पतपेढीचे अध्यक्ष जनार्दन जाधव, रायगड जिल्हाध्यक्ष संजय जाधव यांच्यासह राज्यभरातील असंख्य कार्यकर्ते आणि अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.महेंद्र मोरे यांनी गेली ३० वर्षे संस्थेच्या विविध पदांवर राहून मोलाचे कार्य केले होते. अत्यंत शिस्तबद्ध आणि प्रशासकीय ज्ञानाचा मोठा उपयोग त्यांनी संस्थेच्या कामात कौशल्याने केला. अनेक तरुण बेरोजगारांना जिल्हा उद्योग केंद्राच्या माध्यमातून व्यवसायासाठी शासनाकडून योग्य ते मार्गदर्शन आणि सहकार्य मिळवून देण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती.सामाजिक जाणिवेतून आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेवर प्रगाढ विश्वास ठेवून त्यांनी आयुष्यभर प्रामाणिक कार्य केले. त्यांच्या जाण्याने संस्थेची व सामाजिक क्षेत्राची मोठी हानी झाली असून, उपस्थित हजारो कार्यकर्त्यांनी अश्रूभऱ्या नयनांनी आपल्या लाडक्या नेत्याला आणि कार्यकर्त्याला अंतिम निरोप दिला पनवेल येथे त्यांची श्रद्धांजली सभा 31 मे ला सकाळी 11 वाजता आयोजित करण्यात आलेली आहे

# गोदामात साठा, पण ‘पीओएस’मुळे खत वाटप ठप्प; येवद्यात युरियासाठी शेतकऱ्यांची धक्काबुक्की-

## पुरवठा कमी असल्याने शेतकरी अडचणीत; यंत्रणेतील त्रुटींमुळे तासन्तास रांगा

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे** : तालुक्यातील येवदा गावात सोमवारी युरिया खताच्या वितरणादरम्यान तीव्र गोंधळ व धक्काबुक्कीची घटना समोर आली. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर खतांची टंचाई जाणवत असल्याने, युरिया आल्याची माहिती मिळताच पहाटे ५ वाजल्यापासूनच शेकडो शेतकऱ्यांनी कृषी केंद्राबाहेर लांबच लांब रांगा लावल्या होत्या. दुपारपर्यंत परिसराचे तापमान ४६ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले. या आग ओकणाऱ्या उन्हात ताटकळत उभे राहिल्याने शेतकऱ्यांचा संयम सुटला आणि काही वेळातच परिस्थिती चिघळली.

येवदा गावात युरियाच्या केवळ ४०० ते ५०० गोण्यांचा पुरवठा झाला होता. मात्र, खत खरेदीसाठी गावात तब्बल ६०० ते ७०० शेतकरी जमा झाले होते. मागणी आणि पुरवठ्यामधील या मोठ्या तफावतीमुळे सकाळपासूनच चिंतेचे वातावरण होते. दुपारी १२ च्या सुमारास खताचे वितरण सुरू झाले, परंतु मर्यादित साठ्यामुळे आधी खत मिळवण्याच्या नादात शेतकऱ्यांमध्ये प्रचंड धक्काबुक्की सुरू झाली. गर्दी अनियंत्रित झाल्याचे पाहून एका दुकानदाराने सुरक्षेच्या कारणास्तव आपले कृषी केंद्र तातडीने बंद केले.

कृषी केंद्रासमोरील वातावरण तापत असल्याचे पाहून ‘येवदा पोलिस ठाण्याचे कर्मचारी तात्काळ



घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी परिस्थिती शांत करत शेतकऱ्यांना शिस्तीत आणले. पोलिसांनी तत्परता दाखवत सर्व शेतकऱ्यांना कूपनचे वाटप केले, ज्यामुळे गोंधळ थांबला. पोलिसांच्या या मध्यस्थीमुळे वितरण प्रक्रिया संथ गतीने सुरू झाली आणि शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला.

ऑनलाइन नोंदणीतील त्रुटी ठरल्या कारणीभूत

या गोंधळाचे मुख्य कारण तांत्रिक बिघाड असल्याचे समोर आले आहे. गोदामात युरियाचा पुरेसा साठा उपलब्ध होता, परंतु ‘पीओएस’ मशीनमध्ये ऑनलाइन नोंदणी वेळेवर अद्ययावत झाली नव्हती. उपलब्ध असूनही पीओएस मशीनमध्ये ऑनलाइन स्टॉक अद्ययावत न झाल्यामुळे वितरण रखडल्याची बाब समोर आली. तांत्रिक अडचणींमुळे शेतकऱ्यांना तासन्तास उन्हात थांबावे लागले.

**शेतकऱ्यांचा प्रशासनावर रोष**

उन्हात उभे राहूनही खत न मिळाल्याने उपस्थित शेतकऱ्यांनी प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनावर तीव्र संताप व्यक्त केला. खरीप हंगाम तोंडावर असताना खत न मिळाल्यास पेरण्या लांबणीवर पडतील, अशी भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली. कृषी विभागाने अशा त्रुटी तातडीने दूर करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

**युरिया वितरणातील स्थिती एका नजरेत**

- *उपलब्ध युरिया*: ४०० ते ५०० गोण्या
- *खतासाठी आलेले शेतकरी*: ६०० ते ७००
- *रांगा सुरू झाल्या*: पहाटे ५ वाजल्यापासून
- *गोंधळाची वेळ*: दुपारी १२ वाजता

खरीप हंगामाच्या तोंडावर युरियाचा तुटवडा व वितरणातील अनागोंदीमुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. प्रशासनाने योग्य नियोजन करून पुरेसा साठा उपलब्ध करून द्यावा, अशी आर्त हाक शेतकरी वर्गातून उमटत आहे.

# पद्मश्री जनार्दन बोथे यांचा महाराष्ट्र सदनात सत्कार

**दैनिक युवक आधार नागपूर**

**सतीश कडू संपादक विभाग नवी दिल्ली :** आपल्या समर्पित लोकसेवेने महाराष्ट्राची मान राष्ट्रीय पातळीवर उंचावणारे पद्मश्री जनार्दन बोथे यांचा महाराष्ट्र सदनात आज एक विशेष कौतुक सोहळा आयोजित करण्यात आला होता. महाराष्ट्र सदनाच्या निवासी आयुक्त व सचिव आर. विमला यांच्याहस्ते त्यांचा शाल, पुष्पगुच्छ आणि रोपटे देऊन सन्मानित करण्यात आले.

महाराष्ट्र सदनात आयोजित या सोहळयाला माहिती संचालक हेमराज बागुल, सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे, जनसंपर्क अधिकारी मनीषा पिंगळे, व्यवस्थापक प्रमोद कोलपते उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना श्री. बोथे म्हणाले,देशाच्या राजधानीत आणि विशेषतः आपल्या राज्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या महाराष्ट्र सदनात झालेला हा सत्कार माझ्यासाठी घरच्या कौतुकासारखा आहे. हा पुरस्कार म्हणजे माझ्या एकट्याचा सन्मान नसून, माझ्या जीवनात आलेले महान संत, स्वातंत्र्यसेनानी राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा आणि कार्याचा हा गौरव आहे. महाराजांनी स्थापन केलेल्या अमरावतीच्या गुरुकुंज आश्रमातून हजारो विद्यार्थी आणि कार्यकर्ते देशाची संस्कृती,



अध्यात्म आणि राष्ट्रप्रेम जगवण्यासाठी अविरत काम करत आहेत. त्या गुरुदेव सेवा मंडळाच्या कार्यकर्त्यांसोबत मला काम करण्याची संधी मिळाली, म्हणूनच आज मी इथपर्यंत पोहोचू शकलो असेही त्यांनी यावेळी सांगितले.

याप्रसंगी बोलताना निवासी आयुक्त आर. विमला यांनी जनार्दन बोथे यांच्या कार्याचा गौरव केला. महाराष्ट्राच्या मातीतून देशपातळीवर चमकणाऱ्या अशा ज्येष्ठ आणि मार्गदर्शक व्यक्तिमत्त्वाचा सत्कार करण्याची संधी महाराष्ट्र सदनाला मिळाली, हे आमचे भाग्य असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

माहिती संचालक हेमराज बागुल यांनी बोथे यांचे सामाजिक कार्य या क्षेत्रात काम करू इच्छिणाऱ्या तरुण पिढीसाठी अत्यंत प्रेरणादायी असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमाला महाराष्ट्र सदनातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# वन्य प्राण्यांच्या हालचालीच्या माहितीसाठी एक हजार गावांमध्ये एआयआधारित अर्लट यंत्रणा- वनमंत्री गणेश नाईक

**दैनिक युवक आधार**

**नागपूर सतीश कडू संपादक विभाग :** मानव वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी राज्यात पहिल्या टप्प्यात दहा ठिकाणी नियंत्रण कक्ष उभारणे, राज्यातील एक हजार गावांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित अर्लट यंत्रणा उभारणे तसेच दोन रेस्क्यू सेंटर व दहा उपचार केंद्रे उभारण्यास राज्य वन्य जीव मंडळाच्या स्थायी समितीच्या बैठकीत अध्यक्ष तथा वन मंत्री गणेश नाईक यांनी मंजुरी दिली. हा प्रकल्प सुमारे २६० कोटी रुपयांचा असून मानवांवरील वन्यजीवांचे हल्ले रोखण्यासाठी तातडीने या उपाययोजना राबविण्याचे निर्देश मंत्री नाईक यांनी यावेळी दिले.

राज्य वन्य जीव मंडळाच्या स्थायी समितीची बैठक मंत्रालयात वन मंत्री श्री. नाईक यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी आमदार समीर मेघे, प्रधान मुख्य वन संरक्षक




(वनबल प्रमुख) श्रीनिवास राव, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) एम. श्रीनिवास रेड्डी, उपसचिव निकिता पांडे, विशेष कार्य अधिकारी उदय ढगे यांच्यासह समितीचे सदस्य उपस्थित होते.

राज्यातील मानव वन्यप्राणी संघर्ष टाळण्यासाठी व मानवी जीविताची हानी होऊ नये यासाठी वन विभागाच्या वतीने कृतीआराखडा तयार केला आहे. या आराखड्याअंतर्गत पोलीस नियंत्रण कक्षाच्या धर्तीवर राज्यात विविध भागात दहा नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात येणार आहेत. हे नियंत्रण कक्ष अत्याधुनिक डिजिटल यंत्रणानी सुसज्ज असतील. या नियंत्रण कक्षाद्वारे वन विभागाची संसाधने, वाहने, गस्ती पथक यांचे ट्रॅकिंग करण्यात येईल. मानव वन्यजीव संघर्षाची परिस्थिती उद्भवल्यास नियंत्रण कक्षाद्वारे संबंधितांना तत्काळ कळविण्यात येऊन आवश्यक कार्यवाही करण्यात येणार आहे, अशी माहिती मंत्री नाईक यांनी दिली.

तसेच वन क्षेत्राबाहेर वन्य प्राण्याचे अस्तित्व आढळल्यास ग्रामस्थांना कळावे, यासाठी वन क्षेत्रालगतच्या गावांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित अर्लट यंत्रणा प्रायोगिक तत्वावर उभारण्यात आल्या आहेत. या यंत्रणेची उपयुक्तता लक्षात आल्यामुळे आता ही यंत्रणा राज्यातील सुमारे एक हजार गावांमध्येही उभारण्यात येणार आहे. यामुळे वन्य प्राण्यांच्या हालचालीची माहिती तातडीने ग्रामस्थाना मिळून ते दक्ष राहतील. याशिवाय पकडलेल्या वन्य प्राण्यांसाठी रेस्क्यू सेंटर उभारण्यात येणार आहेत. तसेच वन्य प्राण्यांवरील उपचारासाठी दहा ठिकाणी ट्रान्झिट ट्रिटमेंट सेंटरही उभारण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

वन्य प्राण्यांच्या सुटकेसाठी २० ठिकाणी रॅपिड रेस्क्यू टीमची निर्मिती करण्यात येणार आहे. वन क्षेत्राच्या गावांमध्ये वन्य प्राण्यांपासून रक्षणासाठी वन विभागाच्या मदतीसाठी दोन हजार प्राथमिक प्रतिसाद दल (प्रायमरी रिस्पॉन्स टीम) तयार करण्यात येणार आहेत.

शेतपिकांचे नुकसान करणाऱ्या हरण, माकडे, रान डुक्कर आदी प्राण्यांना पकडण्यासाठी दोन फिरती पथके स्थापन करण्यात येणार आहेत. ज्या ठिकाणी या प्राण्यांचा उपद्रव होत आहे, त्याठिकाणी जाऊन या प्राण्यांना पकडून ती पुन्हा वनक्षेत्रात सोडण्याचे काम ही पथके करणार आहेत. ही पथके अत्याधुनिक साधनांनी युक्त असतील. तसेच माकडे व रानडुकरांची संख्या नियंत्रणासाठी राज्यात दोन ठिकाणी नसबंदी केंद्रे उभारण्याचे प्रास्तावित आहे.

या उपाययोजनांमुळे मानव वन्यजीव संघर्ष टाळण्यास मदत होणार असून शेतकऱ्यांच्या पिकाचेही नुकसान टळणार आहे. त्यामुळे या उपाययोजना तातडीने राबविण्याचे निर्देशही यावेळी मंत्री नाईक यांनी दिले.

# नवी मुंबई महानगरपालिकेकडून जनतेच्या जीवाशी खेळ कंत्राटदारांच्या भल्यासाठीच मोबाईल टॉवर उभारणीचा घाट?

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** नवी मुंबई महानगरपालिकेकडून शहरात मोठ्या प्रमाणावर मोबाईल टॉवर उभारण्याचे काम सुरू असून, स्थानिक नागरिकांचा तीव्र विरोध असतानाही प्रशासन मात्र कंत्राटदारांच्या हितासाठीच काम करत असल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून केला जात आहे. रहिवासी भाग, शाळा, रुग्णालये आणि गर्दीच्या परिसरात मोबाईल टॉवर उभारले जात असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मात्र जनतेच्या आक्षेपांकडे दुर्लक्ष करत पालिका अधिकाऱ्यांनी "डोळेझाक" केल्याचा आरोप होत आहे.

पालिकेच्या लोकेशन कराराप्रमाणे संबंधित मोबाईल टॉवर हा सेक्टर ११ टी-जंक्शन परिसरात उभारणे अपेक्षित होते. मात्र प्रत्यक्षात हा टॉवर सेक्टर १०



मधील संत निरंकारी चौक परिसरातील मेघमल्हार सोसायटीजवळ उभारण्यात आला. या निर्णयामुळे स्थानिक रहिवाशांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. आयुक्त कैलास शिंदे यांना व संबंधित अधिकाऱ्यांना रितसर पत्रव्यवहार करण्यात आला असून अद्याप कार्यवाही नाही.

स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, अनेक ठिकाणी मोबाईल टॉवर उभारणीपूर्वी कोणतीही सार्वजनिक सुनावणी घेण्यात आलेली नाही. रहिवाशांची परवानगी, आरोग्यविषयक अभ्यास किंवा सुरक्षेचे निकष याकडे दुर्लक्ष करून थेट परवानग्या दिल्या जात आहेत. "जनतेचा जीव धोक्यात घालून मोबाईल कंपन्या आणि कंत्राटदारांना फायदा करून देण्याचा उद्योग सुरू आहे," असा संतप्त आरोप नागरिकांनी केला.

विशेष म्हणजे, मोबाईल टॉवरमधून निर्माण होणाऱ्या रेडिएशनबाबत अनेक वेळा नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्तींवर याचा परिणाम होऊ शकतो, अशी भीती व्यक्त होत असताना पालिकेकडून मात्र कोणतीही स्पष्ट भूमिका घेतली जात नसल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

नागरिकांनी अनेकदा लेखी तक्रारी, निवेदने आणि आंदोलनाचा इशाराही दिला असल्याचे सांगितले जाते. तरीही संबंधित विभाग आणि अधिकारी हे कंत्राटदारांच्या बाजूने उभे राहत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. "जनतेच्या भावना, आरोग्य आणि सुरक्षेपेक्षा कंत्राटदारांचे आर्थिक हित महत्त्वाचे ठरत आहे का?" असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनी या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली असून, मोबाईल टॉवर परवानग्यांमध्ये मोठा आर्थिक व्यवहार झाल्याची शक्यता नाकारता येत नसल्याचेही म्हटले आहे.

विरोध वाढत असताना नवी मुंबई महानगरपालिकेने यावर स्पष्ट भूमिका मांडावी आणि नागरिकांच्या विश्वासात घेऊनच पुढील निर्णय घ्यावेत, अशी मागणी जोर धरत आहे.

# निफाडच्या उत्तर भागातील गावांत रात्रीचे भारनियमन; नागरिक त्रस्त

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** निफाड तालुक्यातील शिवडी, उगाव आणि खेडे परिसरातील गावांमध्ये




गेल्या पंधरा दिवसांपासून मध्यरात्रीनंतर वारंवार वीजपुरवठा खंडित केला जात असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. ऐन उन्हाळ्यात आणि वाढत्या उकाड्याच्या पार्श्वभूमीवर होत असलेल्या या भारनियमनामुळे शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामस्थ हैराण झाले आहेत.

शिवडी, उगाव, खेडे तसेच परिसरातील वाडी-वस्त्यांवर रात्री १२ नंतर अचानक वीजपुरवठा बंद केला जात असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे. दिवसभर प्रचंड उष्णतेमुळे अनेक कुटुंबे घराबाहेर अंगणात झोपत असतात. मात्र, रात्री वीज खंडित होत असल्याने अंधाराचे साम्राज्य निर्माण होत असून साप, विंचू यांसारख्या सरपटणाऱ्या प्राण्यांचा धोका वाढला आहे. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

दरम्यान, शेतीपिकांना पाणी देण्यासाठी अनेक शेतकरी रात्रीच्या वेळेत मोटारी सुरू करून पाणीपुरवठा करतात. मात्र, अचानक वीज खंडित होत असल्याने शेतीची कामे विस्कळीत होत असून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. आधीच उष्णतेमुळे त्रस्त असलेल्या शेतकरी आणि शेतमजुरांना या अनियमित वीजपुरवठ्याचा मोठा फटका बसत आहे.

वीज वितरण कंपनीने रात्रीच्या वेळेत सुरळीत व अखंडित वीजपुरवठा करावा, अन्यथा शिवडी, उगाव आणि खेडे परिसरातील नागरिकांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

यावेळी दत्तात्रेय सुडके, मधुकर ढोमसे, प्रभाकर मापारी, अब्दुल शेख, नंदू मापारी, पतिंग ढोमसे, वैभव क्षीरसागर, रितेश क्षीरसागर, सचिन क्षीरसागर, अनिल क्षीरसागर, अरुण क्षीरसागर आदींसह अनेक शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# कमी दाबाच्या वीजपुरवठ्याने पिके संकटात, शेतकऱ्यांची चिंता वाढली

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे** : पाथरी/ तालुक्यात उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून बागायती पिकांसाठी मोठ्या प्रमाणात पाण्याची आवश्यकता निर्माण झाली असताना मात्र कमी दाबाच्या वीजपुरवठ्याने आणि सततच्या खंडित होणारी वीज यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे विहीर व बोअर मध्ये पाणी उपलब्ध असतानाही मोटारी योग्य प्रकारे चालत नसल्याने पिकांना वेळेवर पाणी देता येत नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे मुदगल परिसरातील वाघाळा उपकेंद्रामार्फत विद्युत पुरवठा केला जातो मात्र दिवस रात्र वीज ये जा करीत असल्याने शेतीच्या कामावर मोठा परिणाम होत आहे विशेषतः शेतातील विद्युत पुरवठा सतत खंडित असतो सध्या बागायती पिकांवर मोठ्या प्रमाणात खर्च करून ही योग्य वीजपुरवठा नसल्याने उत्पादन धोक्यात आले आहे त्यामुळे महावितरण विभागाने तातडीने दखल घेऊन वीजपुरवठा सुरळीत करावा अशी मागणी शेतकऱ्यांमधून व्यक्त केली जात आहे

## अजगराला उकाड्यामुळे अजगर व अन्य वन्यजीव मानवी वस्तीत !

# दहा फूट लांबीच्या अजगराला सर्पमित्राकडून जीवदान

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** चिरनेर मुळपाडा येथील अरुण काशिनाथ मुंबईकर यांच्या घराजवळ ठेवण्यात आलेल्या पत्राच्या अडगळीत भर दुपारच्या वेळेत गारव्याच्या शोधात आलेल्या सर्वसाधारणता: नऊ ते दहा फूट लांबीचा भला मोठा अजगर मंगळवारी (दि. 26) आढळून आल्याने, अरुण मुंबईकर यांच्या पत्नी कमल मुंबईकर या एकट्याच



घरात असल्यामुळे घाबरून गेल्या. मात्र प्रसंगावधन राखत, त्यांनी मुलगा प्रतीक मुंबईकर याला मोबाईलद्वारे अजगराचा वावर असल्याची माहिती दिली. प्रतीक मुंबईकर यांनी स्थानिक सर्पमित्र जयवंत ठाकूर यांच्याशी संपर्क साधून, घराजवळ अजगर असल्याची माहिती दिली.

माहिती मिळताच, सर्पमित्र जयवंत ठाकूर यांनी घटनास्थळ गाठले. आणि गारव्याच्या शोधात आलेल्या अजगराला मोठ्या शिताफीने पकडून जीवदान दिले. मानवी वस्तीत उकाड्यामुळे वन्यजीव शिरकाव करू लागले आहेत. त्यामुळे साधारणतः 9 ते 10 फूट लांबीचा हा अजगर दुपारच्या भर उन्हाच्या वेळी गारव्याच्या शोधात आला असावा. मात्र कोणाला इजा होण्या आधीच सर्पमित्र जयवंत ठाकूर यांनी या अजगराला काळजीपूर्वक पकडून त्याला जीवदान दिले. त्यानंतर त्याला उरण तालुका वनविभागाच्या निर्देशानुसार सुरक्षित वनक्षेत्रात सोडून दिले.

# समृद्ध पंचायत राज अभियानात तालुक्यात पाणजे प्रथम, जासई द्वितीय

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी** : उरण तालुक्यातील पाणजे ग्रामपंचायतीने विकासाचा दमदार ठसा उमटवत मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानात तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला असून तब्बल 15 लाख रुपयांच्या बक्षिसावर आपले नाव कोरले आहे. तर जासई ग्रुप ग्रामपंचायतीनेही उल्लेखनीय कामगिरी करत द्वितीय क्रमांक मिळवत 12 लाख रुपयांच्या बक्षिसाचा मान पटकावला आहे. जागर बदलाचा, समृद्ध महाराष्ट्राचा हा मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाचा नारा प्रत्यक्ष कृतीत उतरवत उरण तालुक्यातील या दोन्ही ग्रामपंचायतींनी विकासाचा झेंडा उंचावला आहे. रायगड जिल्हा परिषद अलिबाग आणि पंचायत समिती उरण यांच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या या अभियानात ग्रामविकास, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, प्रशासनातील पारदर्शकता, जनसहभाग, नागरिक सुविधा आणि गावांच्या सर्वांगीण विकासाच्या निकषांवर मूल्यमापन करण्यात आले.

त्यामध्ये पाणजे ग्रामपंचायतीने उत्कृष्ट नियोजन, स्वच्छता मोहिमा, नागरिकाभिमुख उपक्रम आणि गावाच्या विकासासाठी राबविण्यात आलेल्या योजनांच्या जोरावर तालुक्यात अव्वल स्थान पटकावले. गावातील विविध विकासकामांमुळे पाणजे ग्रामपंचायतीचा ठसा संपूर्ण तालुक्यात उमटला आहे.तर जासई ग्रुप ग्रामपंचायतीनेही विकासाचा ध्यास घेत प्रभावी कामगिरी करत द्वितीय क्रमांक मिळवला. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची दखल घेत जासई ग्रामपंचायतीला हा मान मिळाला आहे.

आज अनेक ठिकाणी ग्रामविकासाच्या नावाखाली राजकारण आणि आरोप-प्रत्यारोप सुरू असताना पाणजे आणि जासई ग्रामपंचायतींनी प्रत्यक्ष काम करून दाखवत विकास बोलतो हे सिद्ध केले आहे. गाव बदलायचं असेल तर लोकसहभाग आणि प्रामाणिक कामाची जिद्द आवश्यक असते, हे या दोन्ही ग्रामपंचायतींनी दाखवून दिले आहे.या यशानंतर सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य आणि ग्रामस्थांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. हे यश संपूर्ण गावकऱ्यांच्या सहकार्याचे फळ आहे, अशी भावना ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी व्यक्त करत नागरिकांचे मनापासून आभार मानले आहेत.उरण तालुक्यात आता पाणजे पॅटर्न आणि जासई विकास मॉडेलची जोरदार चर्चा सुरू झाली असून ग्रामीण विकासासाठी या दोन्ही ग्रामपंचायती आदर्श ठरत असल्याची प्रतिक्रिया विविध स्तरांतून व्यक्त होत आहे.

# अनुसूचित जाती उपवर्गीकरणाविरोधात कृपाल तुमाने यांना निवेदन

## सरकारला तीव्र आंदोलनाचा इशारा - मुंदाफळे

**दैनिक युवक आधार**

**नागपूर सतीश कडू संपादक विभाग** : कृपाल तुमाने (विधानपरिषद आमदार, शिवसेना शिंदे गट) यांना अनुसूचित जातींच्या 'अ, ब, क, ड' उपवर्गीकरणाविरोधात कडक निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनाद्वारे समाजात फूट पाडणाऱ्या निर्णयाला तात्काळ स्थगिती देण्याची मागणी करत सरकारला थेट इशारा देण्यात आला आहे.

शिवसेनेचे सामाजिक कार्यकर्ते प्रेम (हितेश) युवराज मुंदाफळे यांनी आमदार कृपाल तुमाने यांची भेट घेऊन अनुसूचित जातींमध्ये करण्यात येत असलेल्या उपवर्गीकरणाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली. "आरक्षण हे घटनात्मक हक्क आहे, त्यात भेदभाव किंवा विभागणी करण्याचा



प्रयत्न दलित समाज कदापि सहन करणार नाही," असे निवेदनात स्पष्ट नमूद करण्यात आले.

यावेळी सरकारच्या धोरणांवर कठोर शब्दांत टीका करत, "समाजात फूट पाडण्याचे राजकारण बंद करा, अन्यथा राज्यभर तीव्र जनआंदोलन उभारले जाईल," असा इशारा देण्यात आला. निवेदनात आरक्षण प्रक्रियेत समान न्याय, आरक्षण मर्यादा वाढविणे आणि कोणत्याही प्रकारची जातीय विभागणी थांबविण्याची मागणी करण्यात आली.

आमदार कृपाल तुमाने यांनी निवेदन स्वीकारून विषय शासन स्तरावर मांडण्याचे आश्वासन दिल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास महाराष्ट्रभर रस्त्यावर उतरून मोठे आंदोलन उभारले जाईल, असा इशारा कार्यकर्त्यांनी दिला आहे.

"दलित समाजाच्या हक्कांवर कुठलाही घाला सहन केला जाणार नाही; अन्यायाविरोधात संघर्ष अधिक तीव्र होईल," असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# तीन महिन्यांतच कॉँक्रीट रस्त्याचे ‘पितळ’ उघडे

## शिवडी येथील पर्यायी मार्गाची दुरवस्था; लोखंडी गज उघडे पडल्याने अपघातांचा धोका, नागरिकांत संताप

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : मध्य रेल्वे मार्गावरील शिवडी येथील रेल्वे उड्डाणपुलाच्या कामासाठी बंद करण्यात आलेल्या रेल्वे गेटमुळे वाहतुकीसाठी तयार करण्यात आलेला पर्यायी सिमेंट कॉँक्रीटचा रस्ता अवघ्या तीन महिन्यांतच उखडू लागल्याने कामाच्या दर्जाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. लाखो रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले असून काही भागात कॉँक्रीटमधील लोखंडी गज उघडे पडल्यामुळे वाहनधारकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे स्थानिक ग्रामस्थ, वाहनचालक आणि व्यापाऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

निफाड-चांदवड मार्गावरील शिवडी येथे मध्य रेल्वेच्या वतीने उड्डाणपुलाचे काम हाती घेण्यात आले आहे. या कामासाठी १ एप्रिलपासून शिवडी रेल्वे गेट वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद करण्यात आले. त्यामुळे या मार्गावरील दैनंदिन वाहतुकीचा प्रश्न निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर रेल्वे गेटच्या पूर्वेकडील पुलाखालून वाहतुकीसाठी सुमारे दीड किलोमीटर लांबीचा सिमेंट कॉँक्रीटचा पर्यायी रस्ता तयार करण्यात आला. मार्च महिन्यात या रस्त्याचे काम पूर्ण झाले असून एप्रिल महिन्यापासून वाहतुकीसाठी तो खुला करण्यात आला होता.

सुरुवातीला हा रस्ता नागरिकांसाठी दिलासादायक ठरला असला तरी अवघ्या दोन ते अडीच महिन्यांतच रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. अनेक ठिकाणी कॉँक्रीट उखडून खड्डे तयार झाले असून काही भागात लोखंडी सळया बाहेर आल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे या रस्त्यावरून प्रामुख्याने कार, जीप, दुचाकी, ट्रॅक्टर यांसारखी हलकी वाहनेच ये-जा करत असतानाही रस्ता एवढ्या कमी कालावधीत खराब झाल्याने नागरिकांनी निकृष्ट दर्जाच्या कामाचा आरोप केला आहे.

रस्त्यावरील खड्डे आणि उघडे पडलेले गज यामुळे रात्रीच्या वेळी वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. दुचाकीस्वारांना अपघाताचा



धोका वाढला असून काही किरकोळ अपघात झाल्याची माहिती स्थानिकांनी दिली. पावसाळा तोंडावर आला असताना या रस्त्याची अवस्था आणखी बिकट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे पावसाळ्यापूर्वी तातडीने रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, एवढ्या अल्पावधीत रस्ता उखडणे हे कामातील निष्काळजीपणाचे द्योतक आहे. रस्त्याच्या बांधकामात निकृष्ट साहित्य वापरण्यात आले का, कामाची गुणवत्ता तपासण्यात आली होती का, याबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. संबंधित ठेकेदार आणि अधिकाऱ्यांची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

या संदर्भात शिवडीच्या सरपंच संगिता सांगळे, माजी सरपंच प्रमोद क्षीरसागर, उगावचे माजी चेअरमन मधुकर ढोमसे, माजी उपसरपंच प्रभाकर मापारी, बाबुराव सानप, विलास दौंड, अरुण क्षीरसागर, अब्दुल शेख, अनिल क्षीरसागर, संतोष कातकाडे, प्रमोद शिंदे, संदीप क्षीरसागर, कैलास क्षीरसागर आदींसह ग्रामस्थांनी प्रशासनाकडे निवेदन देत तातडीने दुरुस्तीची मागणी केली आहे.दरम्यान, उड्डाणपुलाचे काम पूर्ण होईपर्यंत हजारो वाहनचालकांना याच पर्यायी मार्गाचा वापर करावा लागणार असल्याने प्रशासनाने तातडीने दखल घेऊन रस्त्याची दुरुस्ती करणे आवश्यक असल्याचे मत नागरिकांकडून व्यक्त केले जात आहे.

# कासाडी नदी पुन्हा प्रदूषणाच्या विळख्यात ; संयुक्त पाहणीत गंभीर बाबी उघड, दोषींवर कठोर कारवाईची मागणी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) व पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट रसायनी यांच्यावतीने बुधवार दि.27 रोजी कासाडी नदी प्रदूषण प्रकरणी संयुक्त पाहणी करण्यात आली. कासाडी नदी तळोजा एमआयडीसी परिसरातील रासायनिक उद्योगांकडून सोडल्या जाणाऱ्या सांडपाण्यामुळे गंभीररीत्या प्रदूषित झाल्याचे या पाहणीत निदर्शनास आले. या संयुक्त पाहणीदरम्यान परिसरात अनेक ठिकाणी तीव्र दुर्गंधी पसरलेली आढळून आली. विविध नाले व गटारे रासायनिक मिश्रित पाण्याने भरलेली दिसून आली. काही कारखाने दिवसाढवळ्या रासायनिक सांडपाणी सोडताना आढळल्याचा



आरोप सामाजिक कार्यकर्त्यांनी केला.

कासाडी नदी प्रदूषणासंदर्भात यापूर्वी राष्ट्रीय हरित लवाद (NGT) यांनी मोठी कारवाई करत एमआयडीसी तसेच अनेक कंपन्यांवर मोठ्या प्रमाणात दंडात्मक कारवाई केली होती. तसेच नदी पुनरुज्जीवनासाठी मोठा निधी उपलब्ध करून देत भविष्यात कोणतेही प्रदूषण होणार नाही याची जबाबदारी संबंधित यंत्रणांवर निश्चित केली होती. मात्र, तरीही पुन्हा मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असल्याने पर्यावरणप्रेमी व नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. यावेळी पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष अरुण गोविंद जाधव यांनी सांगितले की, “नवी मुंबई येथील महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी आपले कर्तव्य प्रभावीपणे पार पाडत नसल्यामुळे कासाडी नदीचे प्रदूषण पुन्हा गंभीर पातळीवर पोहोचले आहे. पर्यावरणाशी खेळ करणाऱ्या उद्योगांवर तातडीने कठोर कारवाई झाली पाहिजे. संयुक्त पाहणीनंतर कासाडी नदी प्रदूषणास जबाबदार असलेल्या उद्योगांवर तात्काळ कठोर कारवाई करावी, प्रदूषण नियंत्रणासाठी प्रभावी उपाययोजना राबवाव्यात आणि संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी, अशी जोरदार मागणी करण्यात आली.या संयुक्त पाहणीत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे क्षेत्र अधिकारी राजू इजुरकर, उमेश जाधव, संतोष मोहरे, पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष अरुण गोविंद जाधव, पाटबंधारे उपविभाग कर्जतचे संदेश मेंगाळ, सामाजिक कार्यकर्ते राकेश भोईर, संजय ओगले, ॲड. सिद्धी प्रमोद बामणे, स्वाती कदम, नितीन जीवने, रोहित इंगळे, दिगंबर गायकवाड आदी उपस्थित होते.

# महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, नागपूर जिल्हा कार्यकारिणी जाहीर

## डॉ. सुनिल भगत,कार्याध्यक्ष; गौतम पाटील, प्रधान सचिव पदी बिनविरोध

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, नागपूर जिल्ह्याची २०२६ ते २०२८ या कालावधीसाठी नवीन जिल्हा कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून डॉ. सुनिल भगत यांची कार्याध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. तसेच बहुजन सौरभच्या निवासी संपादक संध्या राजूरकर यांची अध्यक्षपदी, तर गौतम पाटील यांची प्रधान सचिवपदी एकमताने निवड करण्यात आली.

ही निवड प्रक्रिया दिनांक २३ एप्रिल २०२६ रोजी नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेन्शन सेंटर येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय बैठकीत पूर्ण करण्यात आली. बैठकीत जिल्हा समितीची नव्याने रचना करण्यात आली.

डॉ. सुनिल भगत हे गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीमध्ये सक्रियपणे कार्यरत असून त्यांनी प्रधान सचिव म्हणून प्रभावी जबाबदारी





सांभाळली आहे. सामाजिक प्रश्न, वैज्ञानिक दृष्टीकोनाचा प्रसार आणि जनजागृती अभियानांमध्ये त्यांचे योगदान उल्लेखनीय मानले जाते. विविध सामाजिक संघटनांशी त्यांचा दीर्घकाळ संबंध राहिला असून सामाजिक चळवळींमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला आहे.

नवनिर्वाचित प्रधान सचिव गौतम पाटील हे देखील विविध सामाजिक संघटनांशी जोडलेले असून युवकांमध्ये सामाजिक भान आणि परिवर्तनवादी विचार रुजविण्यासाठी ते सातत्याने कार्य करीत आहेत. त्यांच्या निवडीमुळे संघटनेच्या कामाला अधिक गती मिळेल, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

याचप्रमाणे बहुजन सौरभच्या निवासी संपादक संध्या राजूरकर यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली. सामाजिक, शैक्षणिक आणि परिवर्तनवादी विषयांवर सातत्याने कार्यरत असलेल्या संध्या राजूरकर यांच्या नेतृत्वात संघटनेचे कार्य अधिक व्यापक होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

या निवड प्रक्रियेदरम्यान रामभाऊ डोंगरे, विजया श्रीखंडे, देवयानी भगत आणि देवानंद बडगे यांनी निरीक्षक म्हणून काम पाहिले. कार्यक्रमात उपस्थित सदस्यांनी नव्या कार्यकारिणीचे अभिनंदन करत पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या माध्यमातून वैज्ञानिक दृष्टिकोन, अंधश्रद्धाविरोधी जनजागृती, सामाजिक प्रबोधन आणि संविधानिक मूल्यांचा प्रचार-प्रसार अधिक प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार नव्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

# जय भवानी महाविद्यालयाची विद्यार्थीनी कु .आयशा शेख याची महाराष्ट्र पोलीस मध्ये निवड

## पालक शेख अन्सार यांचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार



**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** - पाटोदा येथील जय भवानी महाविद्यालयाची विद्यार्थीनी व चुंभळी येथील रहिवासी कु.शेख आयशा अन्सार ची नुकतीच महाराष्ट्र पोलीस मध्ये निवड झाली आहे. कु.आयशा शेख ही हुशार व मेहनती विद्यार्थीनी होती. तिच्या निवडी बद्दल तिचे वडिल शेख अन्सार यांचा महाविद्यालयात प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांच्या शुभ हस्ते शाल पुष्पगुच्छ व श्रीफळ देवुन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी प्राचार्य डॉ.विश्वास कदम यांनी कु.आयशा शेख व तिचे पालक यांचे अभिनंदन करून भविष्यासाठी शुभेच्छा! दिल्या. या प्रसंगी ह.भ.प.अप्पासाहेब घुमरे, ॲड.नाईकनवरे, श्री.दत्ता पवार यांची विशेष उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे संचलन प्रा.डॉ.अशोक देवगुडे यांनी केले तर आभार प्रा. बाळासाहेब जोशी यांनी मानले या प्रसंगी सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

# मंगरूळपीरकरांच्या तोंडचे पाणी रस्त्यावर; मानोलीजवळ पाईपलाईन फुटून लाखो लिटर पाण्याचा अपव्यय

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : एकीकडे भीषण उन्हाळ्यामुळे नागरिकांना पाण्याच्या प्रत्येक थेंबासाठी संघर्ष करावा लागत असताना, दुसरीकडे मोतसावंगा धरणावरून नगर परिषद मंगरूळपीरकडे येणारी मुख्य पाईपलाईन मानोली परिसरात फुटल्याने लाखो लिटर पाणी अक्षरशः रस्त्यावर वाहून जात असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. अनेक तासांपासून सुरू असलेल्या या पाण्याच्या अपव्ययामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

मानोलीजवळील परिसरात पाईपलाईन फुटल्यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात असून, उन्हाळ्याच्या दिवसांत पाण्याची तीव्र टंचाई भासत



असताना हा प्रकार अत्यंत गंभीर मानला जात आहे. नागरिकांनी संबंधित विभागाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला असता प्रशासनाकडून मात्र अपेक्षित तत्परता दिसून आली नाही.

याबाबत शिवाजी भोंडने व विशाल निचड यांनी नगरपरिषदेच्या वरिष्ठ कर्मचाऱ्यांशी संपर्क साधून परिस्थितीची माहिती दिली. मात्र संबंधित अधिकाऱ्यांकडून “मी पाहतो”, “मी बघतो”, “मी करतो” अशी उडवाउडवीची उत्तरे देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांच्या संतापात आणखी भर पडली आहे.

स्थानिक नागरिकांनी प्रशासनावर तीव्र नाराजी व्यक्त करत, “एका बाजूला पाण्यासाठी जनतेला टँकरची वाट पाहावी लागते आणि दुसऱ्या बाजूला लाखो लिटर पाणी वाया जात असताना अधिकारी मात्र निष्क्रिय आहेत,” असा संतप्त सवाल उपस्थित केला आहे.

पाईपलाईन फुटल्यामुळे मोठ्या प्रमाणावर जलनुकसान झाले असून, या निष्काळजीपणाला जबाबदार

**नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांची उडवाउडवीची उत्तरे; संतप्त नागरिकांचा सवाल — जबाबदारांवर कारवाई होणार का?**

कोण, याची चौकशी होणे आवश्यक असल्याची मागणी जोर धरू लागली आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई होणार का? तसेच स्थानिक आमदार या गंभीर प्रश्नात लक्ष घालून तातडीने उपाययोजना करणार का? याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, नागरिकांनी तातडीने पाईपलाईन दुरुस्ती करून पाण्याचा होणारा अपव्यय थांबवावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे.

# डोंबिवलीतील पिंपळेश्वर देवस्थान मंदिर ट्रस्टला अतिक्रमण नियमानुकुल करून जमीन देण्यास मंजुरी

**दैनिक युवक आधार**

**कल्याण रमेश राऊत, ग्रामिण प्रतिनिधी** : डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील मौजे सागांव-सोनारपाडा येथील पिंपळेश्वर देवस्थान मंदिर ट्रस्टला अतिक्रमण नियमानुकुल करून चार एकर पंचवीस गुंठे जमीन देण्याचा निर्णय दि.२६मे रोजी मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.या बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

ठाणे जिल्ह्यातील कल्याण तालुक्यातील मौजे सागांव-सोनारपाडा येथील श्री. पिंपळेश्वर देवस्थान मंदिर ट्रस्टच्या वापरात असलेली जागा संस्थेला सामाजिक कार्यासाठी नाममात्र देण्याची विनंती केली होती. याबाबत औद्योगिक विकास महामंडळाने शासनाकडे ठरावाद्वारे माहिती सादर केली होती. त्यावर गृह विभागाचे निर्णय आणि शासनाचे धोरण तसेच कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या समितीने तसेच राज्यस्तरीय समितीने शिफारस केल्यानुसार पिंपळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या नावे करण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली. त्यानुसार आता महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास पुढील कार्यवाही करावी लागेल.

त्यानुसार पिंपळेश्वर देवस्थान मंदिर ट्रस्टला चार एकर २५ गुंठेवरील अतिक्रमण नियमाअनुकुल करून ही जमीन नाममात्र दराने देण्याचा निर्णय घेण्यात आला.मात्र यापुढे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या संपादीत जागेवरील अतिक्रमण काढून टाकणे, किंवा नियमित करणे, स्थलांतरित करणे यासारख्या प्रकरणी महामंडळाने धोरण तयार करावे आणि त्यानुसार कार्यवाही करावी, अशा सूचनाही देण्यात आल्या.

त्याकरीता या प्रकरणाचा पुर्व उदाहरण संदर्भ म्हणून वापर करता येणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# चक्रीवादळाचे तांडव : विज पुरवठा खंडित, गिरगाव परिसरात मोठे नुकसान

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी : जयदीप लोखंडे** : गिरगाव परिसरात रविवारी मध्यरात्री धडकलेल्या चक्रीवादळाने अक्षरशः थैमान घातले. अतिवृष्टीसह आलेल्या वादळामुळे बागल पारडी, सोमठाणा, टोकाई देवी परिसरासह अनेक भागांत मोठ्या प्रमाणात हानी झाल्याची प्राथमिक माहिती आहे.




वादळाची तीव्रता इतकी होती की अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली, वीजवाहिन्या नुकसानग्रस्त झाल्या आणि पूर्ण परिसराचा विज पुरवठा खंडित झाला. प्रशासनाकडून दुरुस्तीचे काम सुरू असले तरी अद्यापही अनेक गावांमध्ये अंधार कायम आहे. शेतकऱ्यांचे नुकसान मात्र अतोनात झाले आहे. तडाख्यात ऊस, मका, भाजीपाला तसेच फळबागांचे मोठे नुकसान झाले असून काही ठिकाणी तर पिके पूर्णपणे आडवी झाली आहेत. पावसाचे पाणी शेतात साचल्याने पिके कुजण्याची शक्यताही वर्तवली जात आहे. आधीच खर्चिक हंगामातून जात असलेल्या शेतकऱ्यांसमोर आता मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे.स्थानिकांनी प्रशासनाकडे तत्काळ पंचनामे करून योग्य मदत मिळण्याची मागणी केली आहे. दरम्यान, ग्रामपंचायत व आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेकडून प्राथमिक तपासणी सुरु असून नुकसानीचा अहवाल शासनाला पाठविण्याची प्रक्रिया वेगाने सुरू आहे. परिसरातील जनजीवन विस्कळीत झाले असून सामान्य नागरिकांना अतिवृष्टीमुळे हालहवालाला तोंड द्यावे लागत आहे. वादळाची भीती अद्यापही कायम असल्याने नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# मानधनाअभावी पाणी-स्वच्छता कंत्राटी कर्मचाऱ्यांचा 'काम बंद'चा इशारा

## १ जूनपासून टप्प्याटप्प्याने आंदोलन; सिल्लोड 'बीडीओ' व छत्रपती संभाजीनगर 'जि.प.'ला निवेदन

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : महाराष्ट्र राज्य गट संसाधन केंद्र (पाणी व स्वच्छता) कंत्राटी कर्मचारी संघटनेच्या वतीने पंचायत समिती अंतर्गत कार्यरत असलेल्या गट व समूह समन्वयकांच्या प्रलंबित मानधनाच्या प्रश्नावर आता आक्रमक पवित्रा घेण्यात आला आहे. आगामी १ जून २०२६ पर्यंत प्रलंबित मानधन न मिळाल्यास तीव्र राज्यव्यापी काम बंद आंदोलन छेडण्याचा इशारा संघटनेने दिला आहे. या संदर्भातील अधिकृत निवेदन छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच सिल्लोडचे गटविकास अधिकारी यांना सादर करण्यात आले आहे.



प्रशासनाला दिलेल्या निवेदनात नमूद केल्यानुसार, पंचायत समिती अंतर्गत पाणी व स्वच्छता विभागात कार्यरत गट समन्वयक व समूह समन्वयक कर्मचारी ग्रामीण भागातील पाणी पुरवठा योजना, स्वच्छ भारत अभियान तसेच जल जीवन मिशन यांसारख्या महत्त्वाकांक्षी योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी सातत्याने प्रामाणिकपणे सेवा बजावत आहेत. मात्र, मागील डिसेंबर २०२५ पासून आजतागायत (तब्बल सहा महिन्यांपासून) या कंत्राटी कर्मचाऱ्यांना मानधन मिळाले नसल्याचे निवेदनात म्हटले आहे. मे महिना संपत आला तरी मानधन न मिळाल्याने कर्मचाऱ्यांची मोठी आर्थिक कोंडी झाली असून मुलांची शाळेची फी, घरखर्च, वैद्यकीय खर्च आणि दैनंदिन गरजा भागविणे अत्यंत कठीण झाल्याची व्यथा कर्मचाऱ्यांनी मांडली आहे.

यापूर्वीही वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे वारंवार तोंडी व लेखी पाठपुरावा करूनही केवळ आश्वासने मिळाली, मात्र प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आली नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे. १ जून २०२६ पर्यंत प्रलंबित मानधन थेट बँक खात्यात जमा न झाल्यास टप्प्याटप्प्याने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संघटनेचे जिल्हा सचिव प्रमोद भुईगळ आणि जिल्हा अध्यक्ष राजेश शिंदे यांनी दिला आहे. या आंदोलनामुळे ग्रामीण भागातील पाणी व स्वच्छतेचे शासकीय कामकाज विस्कळीत झाल्यास, त्यातून निर्माण होणाऱ्या परिस्थितीस प्रशासन जबाबदार राहील, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

**असे असतील आंदोलनाचे टप्पे:**

पहिला टप्पा (१ ते ५ जून २०२६): छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषद कार्यालयासमोर धरणे आंदोलन.

दुसरा टप्पा (८ जून २०२६): शेजारील जळगाव येथील जिल्हाधिकारी कार्यालय ते पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांच्या निवासस्थानापर्यंत पायी यात्रा व धरणे आंदोलन.

तिसरा टप्पा (९ जून २०२६ पासून): मागण्या मान्य होईपर्यंत संपूर्ण राज्यव्यापी काम बंद आंदोलन.

# देवणी नगरपंचायतीला सहा वर्षांपासून कायम मुख्याधिकारी नाही

## प्रशासनातील ढिसाळपणा की लोकप्रतिनिधींचे अपयश

**दैनिक युवक आधार**
**देवणी तालुका प्रतिनिधी पांडुरंग कदम** : देवणी नगरपंचायतीमध्ये इसवी सन 2020 नंतर आजतागायत कायमस्वरूपी मुख्याधिकारी नियुक्त न झाल्याने नगर प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मागील सुमारे सहा वर्षांपासून नगरपंचायतीचा कारभार प्रभारी मुख्याधिकाऱ्यांच्या माध्यमातून चालविला जात असून, कधी निलंगा, कधी अहमदपूर तर कधी उदगीर येथील अधिकाऱ्यांकडे अतिरिक्त पदभार देण्यात येत असल्याने स्थानिक नागरी समस्यांकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याची नागरिकांमध्ये चर्चा आहे.

महाराष्ट्रातील नगरपंचायतींसाठी लागू असलेल्या महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायत व औद्योगिक नगर अधिनियम, 1965 नुसार मुख्याधिकारी हे नगरपंचायतीचे प्रशासकीय प्रमुख मानले जातात. नगरपंचायतीच्या दैनंदिन कामकाजाचे नियोजन, सर्वसाधारण सभांचे (General Body Meeting) नियमानुसार




आयोजन, ठरावांची अंमलबजावणी, विकासकामांचे प्रशासनिक नियंत्रण, आर्थिक व्यवहार व शासन योजनांची अंमलबजावणी यामध्ये मुख्याधिकाऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जाते.

नगरपंचायतीत कायमस्वरूपी मुख्याधिकारी नसल्यामुळे सर्वसाधारण सभा (जीबी बैठक) नियमानुसार व ठराविक कालावधीत होत नसून महाराष्ट्र नगरपंचायत कायद्यानुसार नगरपरिषद/ नगरपंचायतीच्या बैठका निश्चित कालावधीत होणे अपेक्षित असताना, बैठका वेळेवर व नियोजनबद्ध न झाल्यास प्रशासनातील समन्वयाचा अभाव दिसून येतो,

राजकीय स्तरावर पाहता, 2021-22 च्या कालावधीत तत्कालीन भाजपा सत्ताधाऱ्यांच्या मनमानी कारभाराबाबत नाराजी व्यक्त करत जानेवारी 2022 मध्ये नगरपंचायतीच्या निवडणुकीत मतदारांनी मोठा राजकीय बदल घडवून आणला. एकूण 17 नगरसेवकांपैकी काँग्रेसचे 12, राष्ट्रवादी काँग्रेसचे 2, अपक्ष 2 आणि भाजपचा 1 सदस्य निवडून दिले.त्यानंतर काँग्रेसचे स्पष्ट बहुमत असूनही आजपर्यंत कायम मुख्याधिकारी नियुक्त करण्यात यश आले नसल्याने सत्ताधाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.दरम्यान, अपयशाचे खापर स्थानिक आमदारांवर फोडले जात असून, शासनस्तरावर पाठपुरावा करण्यात कमी पडल्याचा आरोप केला जात आहे.

देवणी नगरपंचायतीला कायमस्वरूपी मुख्याधिकारी नेमून प्रशासनाला स्थैर्य देण्यात यावे, जीबी बैठका नियमानुसार वेळेवर घ्याव्यात आणि विकासकामांना गती द्यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## कामगारांच्या हक्कांवर डल्ला टाकणाऱ्यांना सोडणार नाही!”

# वाशीम बांधकाम कामगार मंडळातील कथित भ्रष्टाचाराविरोधात क्रांतिकारी शेतकरी संघटना रणांगणात

**दैनिक युवक आधार**
**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : वाशीम महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या वाशीम कार्यालयातील कथित भ्रष्टाचार, गैरव्यवहार आणि बनावट कागदपत्रांच्या आधारे मंजूर करण्यात आलेल्या प्रकरणांविरोधात आता क्रांतिकारी शेतकरी संघटना आक्रमक झाली असून, संघटनेचे जिल्हाध्यक्ष मा. श्री. बालाजी मोरे पाटील यांनी थेट मंडळाच्या आयुक्तांकडे धडक देत सखोल चौकशीची मागणी केली आहे. कामगारांच्या हक्कांवर गदा आणणाऱ्या अधिकाऱ्यांविरोधात कठोर कारवाई झालीच पाहिजे, अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली आहे. वाशीम जिल्ह्यातील हजारो बांधकाम कामगार शासनाच्या विविध योजनांच्या लाभासाठी मंडळाच्या कार्यालयात येत असतात. मात्र या कार्यालयात कामगारांची मोठ्या प्रमाणावर आर्थिक, मानसिक आणि प्रशासकीय पातळीवर पिळवणूक होत असल्याचा गंभीर आरोप क्रांतिकारी शेतकरी संघटनेने केला आहे. संघटनेचे जिल्हाध्यक्ष मा. श्री. बालाजी मोरे पाटील यांनी याप्रकरणी सविस्तर निवेदन सादर करत अनेक धक्कादायक बाबी समोर आणल्या आहेत.कामगार नोंदणी, नूतनीकरण, शैक्षणिक अर्थसहाय्य, आरोग्य लाभ, सुरक्षा साहित्य, भांडे किट वाटप यांसारख्या योजनांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. अनेक प्रकरणे बनावट कागदपत्रांच्या आधारे मंजूर करण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून, यामध्ये मोठे रॅकेट कार्यरत असल्याची चर्चा जिल्ह्यात रंगू लागली आहे.क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष मा. श्री. बालाजी मोरे पाटील यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, शासनाच्या योजनांचा लाभ खऱ्या गरजू कामगारांपर्यंत पोहोचण्याऐवजी काही भ्रष्ट प्रवृत्ती लाभ लाटत आहेत. गरीब कामगारांच्या हक्काचा पैसा खाणाऱ्यांना आता जनतेसमोर उघडे पाडले जाईल. कामगारांशी उद्धट व अपमानास्पद वर्तन करणाऱ्या अधिकाऱ्यांविरोधातही संताप व्यक्त करण्यात आला आहे.बालाजी मोरे पाटील यांनी निवेदनात सर्व मंजूर प्रकरणांची फेरतपासणी करण्याची मागणी केली आहे. तसेच संपूर्ण चौकशीचे व्हिडिओ चित्रिकरण करण्यात यावे, दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, संबंधितांना तत्काळ निलंबित करावे आणि कामगारांना त्रास देणाऱ्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करावी, अशा ठोस मागण्या करण्यात आल्या आहेत.कामगारांच्या प्रश्नांवर सातत्याने आक्रमक भूमिका घेणारे क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष



**“आता भ्रष्ट अधिकाऱ्यांची गय केली जाणार नाही”“गरीब बांधकाम कामगारांच्या हक्कावर डल्ला मारणाऱ्यां विरोधात क्रांतिकारी शेतकरी संघटना रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही. चौकशी टाळण्याचा किंवा प्रकरण दडपण्याचा प्रयत्न झाला तर जिल्हाभर तीव्र आंदोलन छेडले जाईल. कामगारांना न्याय मिळेपर्यंत लढा सुरूच राहील.”**
**— मा.श्री. बालाजी मोरे पाटील**
**जिल्हाध्यक्ष, क्रांतिकारी शेतकरी संघटना**

मा. श्री. बालाजी मोरे पाटील यांनी पुन्हा एकदा सामान्य कामगारांच्या पाठीशी उभे राहत प्रशासनाला थेट इशारा दिला आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे जिल्ह्यातील बांधकाम कामगारांमध्ये नव्याने आशेचे वातावरण निर्माण झाले असून, भ्रष्टाचाराविरोधातील ही लढाई आता अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

दरम्यान, या निवेदनानंतर वाशीम जिल्ह्यातील बांधकाम कामगारांमध्ये मोठी चर्चा सुरू झाली असून प्रशासन आता नेमकी काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. जर या प्रकरणात निष्पक्ष चौकशी झाली तर अनेक धक्कादायक प्रकार बाहेर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# पनवेल मध्ये अंधश्रद्धा निर्मूलन संवाद शिबिराचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी.भोईर :** सध्या महाराष्ट्रात बुवाबाजीची प्रकरणे एकामागून एक बाहेर येत आहेत. महिलांचे लैंगिक शोषण, आर्थिक शोषण, फसवणूक असे प्रकार त्यातून पहायला मिळत आहेत. बुवाबाजी आणि इतर अमानुष प्रथा, अंधश्रद्धा यातून होणारे समाजाचे शोषण रोखण्यासाठी अंधश्रद्धा निर्मूलन समिती पनवेल शाखेच्या वतीने 'अंधश्रद्धा निर्मूलन संवाद शिबिराचे' आयोजन केले आहे.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची वैचारिक भूमिका, अंधश्रद्धा निर्मूलनाची कार्यपद्धती, बुवाबाजी इत्यादी विषयावर या शिबिरात चर्चा होणार आह. अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम करू इच्छिणारे तसेच हा विचार, कार्यपद्धती समजून घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी हे शिबिर आहे.

खांदा कॉलनी येथील आगरी शिक्षण संस्थेच्या विद्यालयात रविवार दिनांक ३१ मे रोजी शिबिर आहे. स. ९.३० ते सायं. ५ असे पूर्ण दिवस शिबिर असेल. शिबिरास पूर्णवेळ उपस्थिती आवश्यक आहे. इच्छुकांनी खालील क्रमांकावर पूर्व नोंदणी करावी असे आवाहन समितीतर्फे करण्यात आले आहे.

संपर्क : महेंद्र ९५९४०९४७८५, तेजल ८६५२२००७२४, आनंद ९६६४२१२८७०, पूजा ७७६९०७४५१७, प्रवीण ९८३३७७५८१४

# अक्षर संमेलनात रवींद्र रोडगे यांना 'राज्यस्तरीय अक्षर गौरव पुरस्कार' प्रदान!

**दैनिक युवक आधार**
**सेलू प्रतिनिधी शिवाजी पवार** : “माझी शाळा माझा फळा” समूह व SEVRI कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५ व्या राज्यस्तरीय अक्षर संमेलन २०२६ मध्ये, रांगोळी क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल रवींद्र मधुकर रोडगे यांना 'राज्यस्तरीय अक्षर गौरव पुरस्कार २०२६' प्रदान करून सन्मानित करण्यात आले.पंढरपूर येथे संपन्न झालेल्या या सोहळ्यात विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार सोहळा पार पडला. पुण्याचे मुख्याधिकारी (गट-अ) तथा संमेलनाध्यक्ष मा. श्री. शुभम गायकवाड सर, महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाचे



सहसचिव मा. श्री. संजय इंगळे सर, तसेच होप फाउंडेशन महाडचे अध्यक्ष व संमेलन स्वागत अध्यक्ष मा. श्री. नरेंद्र महाडिक सर यांच्या शुभहस्ते रवींद्र रोडगे यांना हा गौरव प्राप्त झाला. याप्रसंगी ज्येष्ठ रांगोळी कलाकार मा. श्री. महादेव गोपाळे सर यांची देखील प्रमुख उपस्थिती होती.

या राज्यस्तरीय अक्षर संमेलनाचे नेटके संयोजन संयोजक मा. श्री. अमित भोरकडे सर आणि मा. श्री. प्रशांत वाघमारे सर यांनी केले होते.

# अधिक मासाच्या आनंदावर काळाचा घाला!

## मद्यधुंद पिकअप चालकाच्या धडकेत वडिलांसह दोन चिमुकल्यांचा जागीच मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : अधिक मासाच्या धोंड्याच्या जेवणाचा आनंद साजरा करून आनंदाने घरी परतणाऱ्या एका सुखी कुटुंबावर काळाने अक्षरशः भीषण घाला घातला. वाशिम-हिंगोली महामार्गावरील देवठाणा फाट्याजवळ मद्यधुंद अवस्थेतील भरधाव बोलेरो पिकअप चालकाने दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात दोन निष्पाप चिमुकल्या मुलींसह त्यांच्या वडिलांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. तर आई गंभीर जखमी असून ती मृत्यूशी झुंज देत आहे. ही हृदयद्रावक घटना मंगळवार, २६ मे रोजी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास घडली असून, संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, ज्ञानेश्वर खडसे (वय ३०, रा. देवठाणा ता. जि. वाशिम) हे आपल्या कुटुंबासह मालेगाव येथे साडूभाऊंकडे अधिक मासानिमित्त आयोजित धोंड्याच्या जेवणाच्या कार्यक्रमासाठी गेले होते. कार्यक्रम आटोपल्यानंतर ते पत्नी वैशाली आणि दोन लाडक्या मुलींसह दुचाकीवरून आपल्या गावी परतत होते. कुटुंबात आनंदाचे वातावरण होते. लहान मुलींच्या खिदळण्याने प्रवास रंगला होता. मात्र नियतीच्या मनात काही वेगळेच लिहिले होते.

वाशिम ते कनेरगाव नाका मार्गावरील देवठाणा फाट्याजवळ मागून भरधाव वेगाने येणाऱ्या बोलेरो पिकअप वाहनाने त्यांच्या दुचाकीला जबर धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, दुचाकीवरील ज्ञानेश्वर खडसे आणि त्यांच्या दोन चिमुकल्या मुली केतकी (वय ७ वर्ष) व कीर्ती (वय ३ वर्ष) यांचा जागीच मृत्यू झाला. काही क्षणांपूर्वी आनंदाने बागडणाऱ्या त्या चिमुकल्या बहिणी काळाच्या पडद्याआड गेल्याने घटनास्थळी उपस्थित नागरिकांचे डोळे पाणावले.




या भीषण अपघातात वैशाली ज्ञानेश्वर खडसे (वय २५) या गंभीर जखमी झाल्या असून, त्यांना तातडीने वाशिम येथील क्रिटिकल हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळत आहे.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, बोलेरो पिकअप चालक हा मद्यधुंद अवस्थेत होता. तो वाहन अत्यंत भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणे चालवत होता. त्याच्या बेफिकीरपणामुळे एका हसत्या-खेळत्या संसाराचा क्षणात चुराडा झाला. अपघातानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. नागरिकांनी संताप व्यक्त करत मद्यधुंद वाहनचालकांवर कठोर कारवाईची मागणी केली आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले असून, आरोपी वाहनचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती समोर आली आहे.या घटनेमुळे देवठाणा गावासह संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. गावातील प्रत्येकाच्या डोळ्यात अश्रू असून, “एका क्षणात पूर्ण कुटुंब उद्ध्वस्त झाले,” अशी हळहळ व्यक्त केली जात आहे.ज्या माऊलीने आपल्या लेकरांना कुशीत घेऊन आनंदाने प्रवास सुरू केला होता, त्या वैशाली खडसे यांना अजूनही आपल्या पतीसह दोन चिमुकल्या मुलींचा मृत्यू झाल्याची पूर्ण कल्पनाही नसल्याचे सांगितले जात आहे.

त्या स्वतः मृत्यूशी झुंज देत हॉस्पिटलमध्ये उपचार घेत आहेत. एका क्षणात संसार उद्ध्वस्त झालेल्या या घटनेने संपूर्ण वाशिम जिल्हा हादरून गेला आहे.

# भगवान जगन्नाथ यांच्या पवित्र भूमी भुवनेश्वर येथे 29 ते 31 मे दरम्यान अभाविपची राष्ट्रीय कार्यकारी परिषद बैठक आयोजित होणार

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर :** शिक्षण, संघटन, राष्ट्रीय सुरक्षा, आर्थिक व समसामयिक विषयांवर चर्चा करून प्रस्ताव मंजूर केले जाणार अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) ची राष्ट्रीय कार्यकारी परिषद बैठक २९ ते ३१ मे २०२६ दरम्यान भगवान जगन्नाथ यांच्या पवित्र भूमी भुवनेश्वर येथील शिक्षण 'ओ' अनुसंधान विद्यापीठात आयोजित करण्यात येणार आहे. देशभरातील सर्व प्रांतांतून ४८४ कार्यकर्ता प्रतिनिधी या बैठकीस उपस्थित राहणार असून, त्यामध्ये अभाविपचे राष्ट्रीय पदाधिकारी, देशभरातील शैक्षणिक परिसरांतील विद्यार्थी नेतृत्वकर्ते, शिक्षणतज्ज्ञ तसेच विविध आयामांशी संबंधित प्रतिनिधी कार्यकर्ते सहभागी होणार आहेत।

बैठकीपूर्वी २७ मे रोजी केंद्रीय कार्यसमितीची बैठक आयोजित करण्यात येणार असून, त्यामध्ये देशभरातून एकूण १०६ कार्यकर्त्यांची उपस्थिती अपेक्षित आहे. तसेच २८ मे रोजी अभाविपच्या विविध आयाम, कार्य व उपक्रमांची बैठक आयोजित करण्यात येईल. या बैठकीत वर्षभर राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे, कार्यक्रमांचे, विस्तार योजनांचे तसेच आगामी कार्ययोजनांचे सविस्तर चिंतन केले जाईल. क्रीडा, कला, सेवा, पर्यावरण, संशोधन, वैद्यकीय, कृषी, तंत्रज्ञान, जनजातीय तसेच आंतरराष्ट्रीय विद्यार्थी संपर्क इत्यादी विविध क्षेत्रांत सुरू असलेल्या कार्यांचा आढावा घेऊन विस्ताराची दिशा निश्चित करण्यात येईल।

बैठकीच्या पूर्वसंध्येला "नागरिक अभिनंदन समारंभ" आयोजित करण्यात येणार आहे. या समारंभात अभाविपचे




माजी व विद्यमान कार्यकर्ते, समाजजीवनातील विविध क्षेत्रांतील मान्यवर, शिक्षणतज्ज्ञ तसेच सामाजिक नेतृत्वकर्ते उपस्थित राहतील. या कार्यक्रमात ओडिशा सरकारचे माननीय मुख्यमंत्री श्री मोहन चरण माझी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत।

तीन दिवसीय राष्ट्रीय कार्यकारी परिषद बैठकीत वर्तमान राष्ट्रीय परिस्थिती, शिक्षण व्यवस्था, युवकांची भूमिका, राष्ट्रीय सुरक्षा, सामाजिक व आर्थिक विषय, संघटनात्मक समीक्षा व विस्तार तसेच समसामयिक आव्हानांवर व्यापक विचारमंथन होणार आहे. यावेळी 'अखिल भारतीय विचार बैठक २०२५' चा आढावा तसेच 'संघटनात्मक विचार बैठक २०२६' मधील निर्णयांचे संकलन व अंमलबजावणी यावर सविस्तर चर्चा होईल. तसेच अभियानात्मक, कार्यक्रमात्मक व संघटनात्मक विषयांच्या आढाव्यासह आगामी वर्षाची कार्ययोजना निश्चित केली जाईल. सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थी संघ निवडणुका व्हाव्यात यासाठी देशभरातील विविध महाविद्यालये व विद्यापीठांतून आलेले विद्यार्थी संघ पदाधिकारी व कार्यकर्ते चर्चेत सहभागी होतील

अभाविपद्वारे राबविण्यात आलेल्या 'स्क्रीन टाइम टू ॲक्टिव्हिटी टाइम अभियान', 'वंदे मातरम् चे १५० वर्ष', 'छात्रावास सर्वेक्षण अभियान', 'प्रा. यशवंतराव केलकर जन्मशताब्दी वर्ष', 'आणीबाणी विरोधाच्या ५० वर्षांचा स्मरणोत्सव', 'श्री गुरु तेगबहादुर बलिदान दिनाचे ३५० वर्ष', 'संत शिरोमणी रविदासजींच्या ६५० व्या प्राकट्योत्सवा'सारख्या विषयांवर चिंतन-मंथन करून आगामी कार्ययोजना निश्चित करण्यात येईल. संघटनात्मक गुणवत्तावृद्धीसाठी सदस्यता, परिसर इकाई गठन व इतर विषयांवर चर्चा होणार असून, विविध प्रांतांनी राबविलेल्या विशेष अभियानांचे व इकायांमधील नव्या प्रयोगांचे विश्लेषण करून आगामी वर्षासाठी उद्दिष्टे निश्चित केली जातील. राष्ट्रीय अधिवेशन २०२६, SEIL यात्रा, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी संपर्क तसेच विविध आयामांच्या आगामी योजनांवरही विचारमंथन करण्यात येईल. तसेच शिक्षण, सामाजिक, आर्थिक, राष्ट्रीय सुरक्षा आणि युवकांशी संबंधित समसामयिक विषयांवर चर्चा करून प्रस्ताव मंजूर केले जातील।

अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे राष्ट्रीय महामंत्री डॉ. वीरेंद्र सिंह सोलंकी म्हणाले की, "राष्ट्रीय कार्यकारी परिषद बैठक ही वर्तमान काळातील आव्हाने व संधी यांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थी परिषदेची आगामी दिशा निश्चित करणारी अत्यंत महत्त्वपूर्ण बैठक आहे. या बैठकीत देशभरातील सर्व प्रांतांमधून अभाविपचे प्रमुख कार्यकर्ते उपस्थित राहतील. विविध संघटनात्मक, शैक्षणिक, पर्यावरणीय, आर्थिक, राष्ट्रीय सुरक्षा तसेच युवकांच्या भूमिकेसंबंधी विषयांवर व्यापक चिंतन व मंथनानंतर प्रस्ताव मंजूर केले जातील. या विषयांवर आगामी काळात अभाविपची प्रत्येक नगर व परिसर इकाई कार्य करेल. भुवनेश्वरच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक भूमीवर आयोजित ही बैठक संघटनात्मक ऊर्जा, वैचारिक स्पष्टता व कार्यक्रमात्मक विस्ताराचे महत्त्वपूर्ण केंद्र ठरून छात्रशक्तीला अधिक सक्षम करेल."

## थोडक्यात

### महिलेसोबत अश्लील वर्तन केल्याने गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** घरी चालत जात असलेल्या महिलेला धक्का देऊन तिच्या सोबत अश्लील वर्तन केल्याप्रकरणी कौशल राम चौधरी (राहणार छोटा खांदा गाव) याच्या विरोधात कामोठे पोलीस ठाण्यात 25 मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीला 27 मे रोजी अटक करण्यात आली. यातील फिर्यादी पीडित महिला या 25 मे रोजी धाकटा खांदा गावातील गणपती मंदिरासमोरील रस्त्यावरून घरी पाय चालत जात होत्या. यावेळी आरोपीने त्यांना धक्का मारला आणि त्यांच्यासोबत अश्लील वर्तन केले. त्यानंतर त्यांना शिवीगाळ करत कोणाला बोलवायचे आहे त्याला बोलव मी घाबरत नाही अशी दमदाटी केली.

### रिक्षा आणि ट्रकच्या अपघातात एकाचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** रिक्षा आणि ट्रकच्या झालेल्या अपघातात रिक्षा चालक मोरेश्वर अनंता सोनावळे (राहणार ठोंबरेवाडी, पोयंजे) यांचा मृत्यू झाला. या अपघाताप्रकरणी ट्रक क्रमांक एम एच 46 बीएम 9761 वरील चालकाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात २७ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.26 मे रोजी पावणे बाराच्या सुमारास ट्रक चालक याने वाहनातील डिझेल संपल्याने ट्रक रस्त्यावर उभा केला होता. यावेळी पार्किंग लाईट दिली नव्हती. यावेळी रिक्षा क्रमांक एम एच ४६ बीडी 5414 वरील चालक मोरेश्वर सोनावळे यांनी थांबलेल्या ट्रकला पाठीमागून धडक दिली. या अपघातात ते गंभीर जखमी झाले. आणि त्यात त्यांचा मृत्यू झाला. हा अपघात आजीवली ब्रिज, जुना पुणे बंगळूर हायवे, पुणे लेनवर, कोनगाव येथे झाला. त्याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस अधिक तपास करत आहेत.

### हातावर फटका मारून केली मोबाईलची चोरी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** रेल्वेने प्रवास करत असताना फटका मारून मोबाईल फोन चोरून नेल्याची घटना ऊसरली रेल्वे फाटकाच्या आधी घडली. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात 26 मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. सार्थक भोसले (राहणार दिघा, नवी मुंबई) हे पनवेल ते खेड असा तुतारी एक्सप्रेसने प्रवास करत होते. यावेळी 64 हजार रुपये किमतीचा मोबाईल फोन त्यांच्या हातात होता. आरोपीने अंधारात झुडपात उभे राहून त्यांच्या हातावर काठीने फटका मारला आणि त्यांचा मोबाईल फोन खाली पाडून तो उचलून चोरून नेला.

### आठ लाख तीन हजारांची फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** बिल न भरल्याने गॅस कनेक्शन कट करण्यात येणार असल्याचा मेसेज पाठवून फोनचा एक्सेस स्वतःकडे घेऊन आठ लाख तीन हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी चार जणांविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात 26 मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.सुरेंद्र दत्तात्रय साळवी हे सेक्टर 15, नवीन पनवेल येथे राहत असून एक मे 2026 रोजी त्यांना आरोपींनी महानगर गॅसचे मागील बिल भरलेले नसल्याने त्यांचे कनेक्शन कट करण्यात येणार असल्याचा व्हाट्सअप वर खोटा मेसेज पाठवला. आणि ते अपडेट करण्याचा बहाणा करून त्यांना फाईल पाठवली. साळवी यांनी ती फाईल ओपन केली असता त्यांच्या फोनचा एक्सेस आरोपी यांनी स्वतःकडे घेतला आणि त्यांची आठ लाख तीन हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केली.

# तलवाडा गावाचा अभिमान : डॉ. उमेश रमेशराव शेटे सर यांना पीएचडी प्रदान

## ग्रामीण भागातून शिक्षण घेऊन गाठली यशाची उंच शिखरे

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी भीमराव गावडे :** तलवाडा गावातील सुपुत्र, अभ्यासू आणि जिद्दी व्यक्तिमत्त्व असलेले डॉ. उमेश रमेशराव शेटे सर यांना "पाणी शुद्धीकरण करण्यासाठी जीवाणूंचा उपयोग" या अत्यंत महत्त्वपूर्ण आणि समाजोपयोगी विषयावरील संशोधन कार्यासाठी पीएचडी प्रदान करण्यात आली आहे.

ग्रामीण भागातील एका साध्या कुटुंबातून शिक्षण घेऊन, अथक परिश्रम आणि जिद्दीच्या बळावर शैक्षणिक क्षेत्रात एवढी मोठी झेप घेणे ही अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. डॉ. उमेश शेटे यांनी M.Sc. आणि PH.D in Microbiology (सूक्ष्मजीवशास्त्र) हे उच्च शिक्षण पूर्ण केले असून त्यांच्या चार संशोधन निबंधांचे (Research Papers) प्रकाशन देखील झाले आहे. त्यांच्या संशोधनामुळे समाजोपयोगी वैज्ञानिक कार्याला नवी दिशा मिळत आहे.

विशेष म्हणजे त्यांनी बारावीपर्यंतचे शिक्षण तलवाड्यासारख्या ग्रामीण भागात पूर्ण केले. ग्रामीण भागात राहूनही मोठी स्वप्ने पाहता येतात आणि ती मेहनतीच्या जोरावर पूर्णही करता येतात, हा आत्मविश्वास त्यांनी तलवाडा गावातील तरुणांसह इतर विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केला



आहे.

त्यांनी B.Sc. Microbiology चे शिक्षण बीड येथे पूर्ण केले, तर M.Sc. शिक्षण डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथे पूर्ण केले. पुढे NET/SET/PET सारख्या स्पर्धात्मक परीक्षांची तयारी करण्यासाठी त्यांनी राजस्थान येथे जाऊन कठोर मेहनत घेतली. सध्या ते विवेकानंद महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील सूक्ष्मजीवशास्त्र विभागात कार्यरत असून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आहेत.

त्यांच्या यशामागची सर्वात प्रेरणादायी गोष्ट म्हणजे त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी. त्यांचे वडील फक्त चौथीपर्यंत, तर आई सातवीपर्यंत शिक्षित आहेत. कुटुंबात कोणतीही शैक्षणिक परंपरा नसताना, बालपणापासून काहीतरी मोठं करण्याची जिद्द त्यांनी मनात बाळगली आणि ती प्रत्यक्षात सिद्ध करून दाखवली. त्यांचे मोठे दोन्ही बंधू किराणा दुकान चालवतात, अशा सामान्य कुटुंबातून आलेल्या व्यक्तीने मिळवलेले हे यश खरोखरच कौतुकास्पद आणि प्रेरणादायी आहे.

आज तलवाडा गावातील एक व्यक्ती शैक्षणिक क्षेत्रात इतकी मोठी भरारी घेत आहे, ही भावना मनस्वी आनंद देणारी आहे. अशा व्यक्तिमत्त्वांमुळे गावाची ओळख निर्माण होते आणि पुढील पिढीला प्रेरणा मिळते.

डॉ. उमेश रमेशराव शेटे सर यांना त्यांच्या पुढील शैक्षणिक, संशोधन आणि सामाजिक कार्यासाठी माझ्याकडून तसेच संपूर्ण कुंड परिवाराकडून मनःपूर्वक खूप खूप शुभेच्छा! प्रा.शाम कुंड"ग्रामीण मातीतून उगवलेले हे ज्ञानाचे दीप अनेक विद्यार्थ्यांच्या आयुष्यात प्रेरणेचा प्रकाश निर्माण करत राहो."

# नवी मुंबई सायबर पोलिसांकडून 61.45 लाखांच्या पॉलिसी फसवणूक प्रकरणातील आरोपीला अटक; दिल्लीतील जाफराबादमधून कारवाई

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई :** 'भारती ॲक्सा' जीवन विमा पॉलिसी बंद करण्याच्या नावाखाली नागरिकाची तब्बल 61 लाखांहून अधिक रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी नवी मुंबई सायबर पोलिसांनी दिल्लीतील जाफराबाद परिसरातून एका आरोपीला अटक केली आहे. या प्रकरणात आंतरराज्यीय सायबर टोळीचा सहभाग असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

दिनांक 1 जुलै 2025 ते 14 एप्रिल 2026 या कालावधीत आरोपीने फिर्यादीशी संपर्क साधून स्वतःला विमा कंपनीचा प्रतिनिधी असल्याचे भासवले. पॉलिसी बंद करण्याच्या प्रक्रियेच्या नावाखाली 'एजंट कोड', 'बीटीसी कोड', कागदपत्र प्रक्रिया आणि कॅश कन्व्हर्जन अशा विविध बहाण्यांनी वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये पैसे जमा करण्यास प्रवृत्त करण्यात आले. या कालावधीत फिर्यादीकडून एकूण 61,45,580 रुपये इतकी रक्कम उकळण्यात आली. मात्र कोणतीही वैध प्रक्रिया पूर्ण न करता ही रक्कम परत न देता फसवणूक करण्यात आली.

या प्रकरणी सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून भारतीय न्याय संहिता आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियमातील संबंधित कलमांनुसार गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. तपासादरम्यान सायबर पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाद्वारे आरोपीचा मोबाईल क्रमांक आणि आर्थिक व्यवहारांचा मागोवा घेतला. त्यातून आरोपीचे ठिकाण दिल्लीतील जाफराबाद परिसर असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर पथकाने तेथे छापा टाकून शाहरूख मेहताब खान याला ताब्यात घेतले.

चौकशीत आरोपीने अन्य साथीदारांसोबत संगनमत करून कॉल सेंटर पद्धतीने नागरिकांना फसवण्याचे काम केल्याची कबुली दिली असून या कामाच्या मोबदल्यात त्याला आर्थिक लाभ मिळाल्याचेही स्पष्ट झाले आहे. या प्रकरणात आणखी काही आरोपींचा सहभाग असल्याचा संशय असून त्यांचा शोध सुरू आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, सहपोलीस आयुक्त दीपक साकोरे, अपर पोलीस आयुक्त प्रमोद शेवाळे आणि पोलीस उपआयुक्त (गुन्हे) सचिन गुंजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सहाय्यक पोलीस आयुक्त धर्मपाल बनसोडे यांच्या निरीक्षणाखाली सायबर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विशाल पाटील आणि त्यांच्या पथकाने ही कारवाई केली.

दरम्यान, विमा पॉलिसी बंद करण्याच्या नावाखाली अनोळखी कॉल, मेसेज किंवा ई-मेल आल्यास नागरिकांनी कोणतीही वैयक्तिक किंवा बँकिंग माहिती शेअर करू नये. अधिकृत ग्राहक सेवा केंद्राशी थेट संपर्क साधूनच खातरजमा करावी, असे आवाहन नवी मुंबई सायबर पोलिसांनी केले आहे.

# 15 वर्षांचा संघर्ष संपला! विष्णुनगर–हनुमान नगरचा शिवरस्ता अखेर झाला खुला

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** निफाड तालुक्यातील विष्णुनगर ते हनुमान नगर दरम्यान गेल्या तब्बल १५ वर्षांपासून बंद असलेला महत्त्वाचा शेतरस्ता अखेर महसूल प्रशासनाच्या पुढाकाराने आणि ग्रामस्थांच्या समन्वयातून मोकळा करण्यात आला. सुमारे १७०० फूट लांबीचा व १८ फूट रुंदीचा हा शिवरस्ता खुला झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांचा वाहतुकीचा दीर्घकालीन आणि जिव्हाळ्याचा प्रश्न मार्गी लागला आहे.

गाव नकाशामध्ये तुटक रेषेने दर्शविण्यात आलेला हा रस्ता अनेक वर्षांपासून वादाच्या भोवऱ्यात अडकला होता. त्यामुळे शेतकऱ्यांना शेतीमालाची ने-आण करताना मोठा मनस्ताप सहन करावा लागत होता. विशेषतः पावसाळ्यात पर्यायी मार्ग नसल्याने अनेक अडचणी निर्माण होत होत्या.

हा प्रश्न सोडवण्यासाठी निफाडचे उपविभागीय अधिकारी डॉ. शशिकांत मंगरूळे आणि तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी प्रशासनाला तातडीने कारवाईचे निर्देश दिले होते. त्यानुसार महसूल, भूमी अभिलेख आणि पोलीस प्रशासनाने संयुक्तरित्या पुढाकार घेत रस्ता मोकळा करण्याची प्रक्रिया सुरू केली.

या मोहिमेत उपअधीक्षक भूमी अभिलेख राजेंद्र भाबड, लासलगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दिपक पाटील तसेच महसूल सहायक शरद घाटगे यांचे विशेष सहकार्य लाभले. आज (दि. २६ मे) विंचूरचे मंडळ अधिकारी संतोष डुंबरे यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी उपस्थित राहून दोन्ही बाजूंच्या शेतकऱ्यांशी संवाद साधला. त्यांनी रस्त्याचे कायदेशीर तसेच व्यावहारिक महत्त्व समजावून सांगितल्यानंतर शेतकऱ्यांनी सकारात्मक भूमिका घेतली.

यानंतर भूमी अभिलेख विभागाकडून तातडीने मोजणी करण्यात आली आणि हद्दीच्या खुणा निश्चित करण्यात आल्या. प्रशासनाचा सकारात्मक दृष्टिकोन, ग्रामस्थांची समजूतदार भूमिका आणि शांततापूर्ण समन्वयामुळे कोणताही वाद न होता हा जुना शिवरस्ता पूर्णपणे खुला करण्यात आला.या कामी ग्राम महसूल अधिकारी शुभम पाटसकर तसेच स्थानिक शेतकरी बांधवांनीही मोलाचे सहकार्य केले. महसूल व पोलीस प्रशासनाच्या संयुक्त आणि समन्वयवादी भूमिकेमुळे कायदा व सुव्यवस्थेचा कोणताही प्रश्न निर्माण न होता हा दीर्घकालीन वाद अखेर मिटला.रस्ता खुला झाल्यानंतर परिसरातील शेतकऱ्यांनी प्रशासनाचे आभार मानत समाधान व्यक्त केले. अनेक वर्षांपासून केवळ नकाशावर तुटक रेषेत दिसणारा हा मार्ग आता प्रत्यक्षात सुरू झाल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# शिवपार्वती मेडिकल्स च्या मोफत आरोग्य शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी(रघुनाथ देवकर):** सातवे येथील शिवपार्वती मेडिकल्सच्या 29 व्या वर्धापनदिनानिमित्त (मोफत) आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ब्लड, शुगर, बी.पी. चेकअप करण्यात आले.तसेच जंताची गोळी व उन्हाच्या तीव्रतेमुळे ओ आर एस लिक्विड चे पण वाटप करण्यात आले. यावेळी तज्ञ मार्गदर्शक व डॉक्टरांची उपस्थिती होती. या शिबीराचा 100 नागरीकानी लाभ घेतला.




केदारलिंग क्लिनिक लॅबॉरिटी सातवे च्या पूजा पाटील वैष्णवी गायकवाड यांचे विशेष सहकार्य लाभले. या कार्यक्रमाचे उध्दघाटन पंचायत समिती पन्हाळा सदस्य मा.माणिक पाटील भाऊ याच्या शुभ हस्ते करण्यात आले.यावेळी माणिक पाटील भाऊ. जिल्हा केमिस्ट असोसियनचे उपाध्यक्ष् श्री किरण जाधव सर. सातवे गावच्या पोलीस पाटील सौ.डॉ. स्वाती निकम डॉ. शिवप्रसाद पाटील डॉ. संदिप जाधव डॉ. प्रमोद पाटील डॉ. प्रसाद लठ्ठे. डॉ. एम व्ही पाटील.डॉ. संतोष निकम, डॉ. ब्रम्हानंदिनी पाटील. डॉ.अनिल सावंत. रामदास निकम.सुषमा निकम. बाळासाहेब नंदुरकर सर.अजित कणसे मेजर. तसेच आयआयटी बॉम्बे येथे शिक्षण घेत असलेले सोहम निकम. पार्थ पाटील.ओंकार तोडकर. पत्रकार दिनकर पाटील. सुनिल पाटील. संगीता यमगर व ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थीत होते. सातवे आणि परिसरातील लोकांना या आरोग्य शिबिराचा लाभ झाला. या केलेल्या व्यवस्थेमुळे अनेक लोकांनी समाधान व्यक्त करून शिवपार्वती मेडिकल्स् चे आभार मानले.

# नांदले गावच्या सुपुत्राची इंदूरमधील आंतरराष्ट्रीय वाक्पटूता परिषदेत ऐतिहासिक कामगिरी; अथर्व टकलेचे मुरुड पंचक्रोशीतून कौतुक!

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी :** मुरुड तालुक्यातील नांदले गावचा (पोस्ट आगारदंडा, जिल्हा रायगड) मूळ रहिवासी आणि सध्या मुंबईत इयत्ता बारावीत शिकणारा तरुण कुमार अथर्व धर्मेंद्र टकले याने इंदूर येथील आंतरराष्ट्रीय वाक्पटूता परिषदेत आपल्या संवाद कौशल्याने मुरुड तालुक्यासह संपूर्ण रायगड जिल्ह्याचा नावलौकिक देशपातळीवर वाढवला आहे. त्याच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संपूर्ण पंचक्रोशीतून आणि तालुका स्तरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

**प्रतिष्ठित 'टोस्टमास्टर्स इंटरनॅशनल' मंचावर सादरीकरण**

सन १९२४ मध्ये स्थापन झालेल्या 'टोस्टमास्टर्स इंटरनॅशनल' या जगप्रसिद्ध संस्थेच्या 'जिल्हा ९८' ची वार्षिक परिषद 'वाक्पटूता २०२६' नुकतीच २२ मे ते २४ मे २०२६ दरम्यान इंदूर (मध्य प्रदेश) येथील 'दि ग्रँड शेरेटन पॅलेस हॉटेल' येथे अत्यंत उत्साहात पार पडली. या अत्यंत प्रतिष्ठित आणि भव्य मंचावर २३ मे २०२६ रोजी अथर्व टकले याला स्वतःची स्वरचित कविता सादर करण्याची सुवर्णसंधी मिळाली. त्याच्या दर्जेदार सादरीकरणाने उपस्थित दिग्गजांची मने जिंकली.



अनुभवाबद्दल बोलताना अथर्व म्हणाला:

"माझी ही पहिलीच मोठी परिषद असल्याने हा अनुभव माझ्यासाठी खूप वेगळा आणि शब्दांत न मांडता येण्यासारखा होता. येथे भारतातील विविध राज्यांतून नामांकित लेखक, वकील, प्राध्यापक, उद्योजक आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील दिग्गज आले होते. त्यांच्याशी वेगवेगळ्या विषयांवर चर्चा करणे हा एक उत्तम अनुभव होता. जागतिक वक्तृत्व स्पर्धेचे विश्वविजेते धनंजय हेट्टीआरच्ची सर आणि टोस्टमास्टर्स आंतरराष्ट्रीयचे माजी आंतरराष्ट्रीय उपाध्यक्ष दीपक मेमन सर यांच्यासारख्या महान व्यक्तींना ऐकणे व त्यांना भेटणे प्रेरणादायी होते. सार्वजनिक वक्तृत्वातील सर्वोच्च सन्मान मिळवलेल्या मान्यवरांच्या उपस्थितीत सादरीकरण करणे हा माझ्या आयुष्यातील सर्वात सुंदर आणि अभिमानाचा क्षण ठरला. "

ग्रामीण भागातून पुढे थेट आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मंचावर आपली चमक दाखवणाऱ्या अथर्वच्या यशाबद्दल मुरुड तालुका आणि नांदले पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी शिक्षकांनी व हितचिंतकांनी त्याचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे .एक अष्टपैलू तरुण वक्ता आणि कवी म्हणून उदयास येत असलेल्या अथर्वला त्याच्या पुढील उज्वल वाटचालीसाठी संपूर्ण महाराष्ट्रातून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# शिवसेना जिल्हाप्रमुख नगरसेवक रामदास शेवाळे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर ) :** शिवसेना जिल्हाप्रमुख तथा पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक रामदास शेवाळे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक, आरोग्य व रोजगाराभिमुख कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांशी बांधिलकी जपत हा वाढदिवस साजरा केला जाणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. रविवार, ३१ मे रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ या वेळेत कळंबोली सेक्टर ३ ई येथील सुधागड शाळा हॉलमध्ये भव्य रोजगार व मोफत कोर्सेस मेळावा आयोजित करण्यात आला आहे. युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याबरोबरच विविध प्रशिक्षण अभ्यासक्रमांची माहिती या मेळाव्यात दिली जाणार आहे.

सोमवार, १ जून रोजी शिवसेना मध्यवर्ती कार्यालय, सेक्टर ३ ई, कळंबोली येथे सकाळी ९ ते ३ या वेळेत मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. नागरिकांच्या आरोग्याची तपासणी तसेच

> **रामदास शेवाळे साहेबांचा वाढदिवस हा केवळ उत्सव नसून समाजसेवेची प्रेरणा आहे. युवकांना रोजगाराच्या संधी, नागरिकांसाठी मोफत आरोग्य व नेत्र तपासणी शिबिरे तसेच आध्यात्मिक कीर्तनाच्या माध्यमातून समाजाशी असलेली बांधिलकी जपण्याचा आमचा प्रयत्न आहे. या सर्व उपक्रमांचा नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, हीच अपेक्षा आहे.**
>
> **तन्मय रामदास शेवाळे(आयोजक)**

वैद्यकीय सल्ला या शिबिरात दिला जाणार आहे. याच दिवशी सकाळी ९ ते ३ दरम्यान मोफत नेत्र तपासणी शिबिराचेही आयोजन करण्यात आले असून गरजू नागरिकांना याचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच सोमवार, १ जून रोजी सायंकाळी ७ ते १० या वेळेत सुधागड शाळा मैदान (जुनी इमारत), सेक्टर ३ ई, कळंबोली येथे ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख (इंदुरीकर) यांचे कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व कार्यक्रमांना नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक तनमय रामदास शेवाळे व रामदास शेवाळे प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

# त्यागमूर्ती माता रमाई स्मृती दिनानिमित्त हिंदी मराठी पत्रकार संघाच्या वतीने अभिवादन

**दैनिक युवक आधार**
**मलकापूर :** येथील पत्रकार संघटनेच्या वतीने त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम भीम गर्जना कार्यालयात श्रद्धापूर्वक संपन्न झाला.



यावेळी उपस्थित मान्यवरांनी माता रमाई यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संघर्षमय जीवनात दिलेल्या त्याग, साथ आणि प्रेरणेचा गौरव केला. दीनदलितांच्या उद्धारासाठी बाबासाहेबांनी उभारलेल्या चळवळीमागे माता रमाई यांचा शांत, संयमी व अढळ पाठिंबा होता. त्यांच्या कार्याची प्रेरणा आजही समाजाला दिशा देणारी असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. कार्यक्रमात भीमगर्जनाचे संपादक प्रकाश थाटे, पत्रकार हिंदी मराठी पत्रकार संघ महाराष्ट्र अध्यक्ष धनश्रीताई काटीकर पाटील, सतीश दांडगे,नथुजी हिवराळे, विनायक तळेकर, सुधाकर तायडे, शेख ताहेर, मयूर लढ्ढा आदी पत्रकार व हिंदी मराठी पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी माता रमाई यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

# क्षेत्र गहिनीनाथ गड व अध्यात्मिक परंपरा...

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. या पवित्र भूमीत अनेक जागृत देवस्थाने आणि संतपीठे आहेत. बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यातील चिंचोली या गावी वसलेला श्री. क्षेत्र गहिनीनाथ गड हे नवनाथ संप्रदाय आणि वारकरी परंपरेचे एक अत्यंत जागृत व पवित्र तीर्थक्षेत्र आहे. गहिनीनाथ महाराजांच्या पावन स्पर्शाने पुनीत झालेल्या या गडाला मोठी ऐतिहासिक आणि आध्यात्मिक परंपरा आहे.

•- गहिनीनाथगडाची ऐतिहासिक पार्श्वभूमी:- गहिनीनाथ हे नवनाथांपैकी एक प्रमुख, सिद्ध आणि करुणामयी व्यक्तिमत्त्व मानले जातात. ते गुरू गोरक्षनाथांचे पट्टशिष्य होते. असे मानले जाते की, गहिनीनाथांचा जन्म त्र्यंबकेश्वर येथील कुशवर्त तीर्थावरील चिखलातून (करळीतून) गुरू गोरक्षनाथांनी पुतळा बनवून व त्यात चैतन्य फुंकून केला. त्यांनी नाथसंप्रदायाची धुरा सांभाळत योगसाधनेचे सर्वोच्च शिखर गाठले आणि समाधी घेतली.

•- परंपरा आणि आध्यात्मिक महत्त्व:- १) नाथ-वारकरी संगम:- गहिनीनाथगडाची सर्वात मोठी खासियत म्हणजे येथे नाथ पंथ आणि वारकरी संप्रदाय यांचा सुवर्णसंगम पाहायला मिळतो. गहिनीनाथांनी लोकांना भक्ती, ज्ञान, कर्म आणि ध्यान या द्वारे मोक्ष मिळवण्याचा मार्ग दाखवला.

•- २) संत यादव बाबा:- श्री क्षेत्र गहिनीनाथ गडाची धुरा यादव बाबा यांनी अंध असुन हि डोळस पणाला साजेल अशी सांभाळली संत वामनभाऊ यांना आपला वारस करून गड व नाथ संप्रदायाची परंपरा त्यांच्या स्वाधीन केली.

३) संत वामनभाऊ महाराज:- या गडाचे आध्यत्मिक, सांप्रदायिक महत्व आधुनिक काळातील संतश्रेष्ठ वामनभाऊ महाराज यांच्या कार्यामुळे अधिक वाढले. फुलसांगवीत सोनवणे कुळात वामनभाऊ यांचा जन्म झाला. संतश्रेष्ठ बंकटस्वामी महाराजांचे शिष्य सर्व गुण संपन्न असे वामनभाऊ महाराजांनी या स्थळावरूनच वारकरी संप्रदायाचा प्रसार केला आणि गरीब सेवेकरी, भाविकांना अध्यात्माची गोडी लावली. शिक्षणाचे महत्व आपल्या किर्तनातुन सांगितले अंधश्रद्धा, भोंदुगिरी नष्ट करण्यासाठी समाज जागृती केली. अज्ञान नष्ट करण्यासाठी आयुष्यभर समाज प्रबोधन केले.

४) संत गोरक्ष महाराज:- संत वामनभाऊ महाराज यांच्या समाधी सोहळा नंतर गहिनीनाथ गडाचे महंत म्हणून भाऊंचे पट्टशिष्य गोरक्ष महाराज यांनी गडाचे महंत म्हणून धुरा सांभाळली.





त्यांनी गडाचे बांधकाम व संत वामनभाऊ यांची परंपरा सक्षमपणे सांभाळली व भाविक भक्त वर्ग वाढवून गडाची किर्ती वाढवली. त्यांना ह.भ.प.पुंडलिक महाराज यांची साथ संगत मिळाली.

५) संत विठ्ठल महाराज:- संत गोरक्ष महाराज यांच्या देह त्यागा नंतर ह.भ.प.विठ्ठल महाराज यांना गडाचे महंत म्हणून जबाबदारी देण्यात आली. संत वामनभाऊंच्या अंगा खांद्यावर खेळलेले विठ्ठल महाराज यांनी गडाचे महंत म्हणून भाऊंच्या सर्व परंपरा व शिकवण, विचार महाराष्ट्रासह अन्य राज्यांत मोठ्या संख्येत भाविक भक्तां पर्यंत पोहोचविले. गडाची भारतभर व भारताबाहेर किर्ती, महती वाढवली गडाच्या सर्वांगिण विकास करत आहेत. विविध विकास कामांचे नियोजन करून भाविक भक्तांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

६) आषाढी वारी परंपरा:- गहिनीनाथ गडावरून दरवर्षी आषाढी एकादशी निमित्त पंढरपूरला पालखी सोहळा जातो. या काळात वारकऱ्यांचा टाळ-मृदंगाचा गजर आणि उत्साह गडावर शिगेला पोहोचतो. महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या दिंडीचा बहुमान दर्जा गहिनीनाथ गडाच्या दिंडीला आहे. हि संत वामनभाऊ यांची परंपरा आजतागायत विठ्ठल महाराज चालवत आहेत.

•- गडावरील कार्यक्रम आणि उत्सव:- गहिनीनाथ गडावर दरवर्षी संत वामनभाऊ महाराजांची पुण्यतिथी आणि इतर धार्मिक उत्सव मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. या वेळी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो भाविक आणि सेवेकरी गडावर जमा होतात. या ठिकाणी भजन, कीर्तन व प्रवचनाची अखंड परंपरा चालू असते.

•- विकास आणि सामाजिक कार्य:- हे स्थळ केवळ अध्यात्मिकच नाही तर सामाजिक सेवेचे ही केंद्र बनले आहे. येथे वारकऱ्यांची गैरसोय होऊ नये याची काळजी स्वतः गडाचे महंत गुरूवर्य ह.भ.प.विठ्ठल महाराज घेत आहेत. गडाच्या विकासासाठी आणि भाविकांच्या सोयीसाठी विविध विकास कामांचे नियोजन करून भक्तांना सुविधा उपलब्ध केली जात आहेत.

याचबरोबर अध्यात्मिक, वारकरी शिक्षणाची सोय व्हावी म्हणून महाराजांनी गडावर अध्यात्मिक विद्यालय सुरू केली आहे. या ठिकाणी असंख्य विद्यार्थी शिक्षण घेत आहेत माझे थोर भाग्य आहे की मला विठ्ठल महाराज यांनी पवित्र तुळशी माळ घालून आशिर्वाद दिला जीवनाला एक अध्यात्मिक परमार्थिक दिशा दिली. म्हणुनच संत वामनभाऊ व संत भगवान बाबा यांचे इंद्रप्रस्थ कॉलनी, बीड येथे १४ वर्षापुर्वी मंदिर बांधण्याचे व सेवा, सप्ताह करण्याची संधी मिळाली. हि संत वामनभाऊ व गुरूवर्य विठ्ठल महाराज यांच्या कृपा आशिर्वादाची ताकत आहे. श्री क्षेत्र गहिनीनाथ गड हे भक्ती व शक्तीचे ऊर्जास्त्रोत आहे.

नि:स्वार्थी सेवा, भक्ती आणि उच्च आध्यात्मिक विचार ही या गडाची परंपरा आहे. संत वामनभाऊ महाराजांच्या स्मृती आणि गहिनीनाथांची कृपा या मुळे हे स्थान भक्तांसाठी शांती आणि चैतन्याचे माहेर घर बनले आहे.

**लेखक**
**•- डॉ राजेंद्र मुरलीधर सानप**
**अध्यक्ष श्री संत भगवान बाबा व श्री संत वामनभाऊ प्रतिष्ठान**
**इंद्रप्रस्थ कॉलनी, नगर रोड बीड.**



# अहमदाबादमध्ये 'इबोला'बाबत अलर्ट! अकरा प्रवासी होम क्वारंटाईन



**नवी दिल्ली :** कोरोना महामारीनंतर आता जगावर 'इबोला' विषाणूचं नवं संकट घोंगावत आहे. जागतिक आरोग्य संघटनेनं डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ द काँगो (DRC) आणि युगांडा इथं इबोलाचा प्रसार होत असल्याबाबत एक सावधगिरीचा इशारा जारी केला आहे. तसंच आफ्रिकेच्या काही भागांमध्ये इबोलाच्या रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता, केंद्र सरकारनं देखील भारतात हाय-अलर्ट जारी केला असून आंतरराष्ट्रीय विमानतळं आणि बंदरांवर कडक स्क्रिनिंग सुरू केलं आहे. अशात गुजरात राज्यातील अहमदाबाद महानगरपालिकेच्या (एएमसी) आरोग्य विभागानं इबोला विषाणूचा संभाव्य प्रसार रोखण्यासाठी व्यापक तयारी केली आहे.आफ्रिकेतील इबोला प्रभावित देशांमधून येणाऱ्या प्रवाशांवर विशेष लक्ष दिले जात असून, विमानतळावर तपासणी सुरू करण्यात आली आहे. अहमदाबाद महानगरपालिकेच्या आरोग्य विभागानं इबोलाचा सामना करण्यासाठी क्वारंटाईन कक्ष तयार केले आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून, गेल्या तीन दिवसांत आफ्रिकेतून अहमदाबादमध्ये आलेल्या ११ प्रवाशांना होम क्वारंटाईन करण्यात आलं आहे. यामध्ये नऊ भारतीय आणि दोन युगांडाच्या नागरिकांचा समावेश आहे.अहमदाबाद विमानतळावर आफ्रिकन देशांमधून येणाऱ्या प्रवाशांची ट्रॅव्हल हिस्ट्री तपासण्याचं काम सुरू करण्यात आलं आहे. इबोलाची लक्षणं आढळणाऱ्या कोणत्याही प्रवाशाला तत्काळ आयसोलेशन करण्यात येणार आहे. युगांडा आणि काँगोसह इतर देशांमधून येणाऱ्या प्रवाशांसाठी अनिवार्य क्वारंटाईनची व्यवस्था करण्यात आली आहे.आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं की, लक्षणं दिसणाऱ्या प्रत्येकाला होम क्वारंटाईन करण्यात येईल. तसंच रुग्णाच्या संपर्कात आलेल्यांना तात्काळ रुग्णालयाच्या आयसोलेशन वार्डमध्ये पाठवलं जाईल. दरम्यान, अहमदाबाद आरोग्य विभागानं नागरिकांना घाबरून न जाता सावधगिरी बाळगण्याचं आवाहन केलं आहे. विभाग परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून आहे. जगभरात इबोलाच्या रुग्णांची वाढती संख्या आणि प्रवाशांची ट्रॅव्हल हिस्ट्री लक्षात घेऊन ही तयारी करण्यात आली आहे. तसंच परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना केल्या जात असल्याचं अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे.युगांडाहून आलेल्या एका महिलेला कर्नाटकची राजधानी बंगळूरू येथील सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. या महिलेमध्ये इबोला विषाणूची लक्षणे आढळून आली आहेत

## नवीन नागपूर, बाह्यवळण रस्त्याच्या भूसंपादन व्यवहारावरील मुद्रांक, नोंदणी शुल्क माफ

**मुंबई :** नवीन नागपूर आणि नवीन बाह्यवळण रस्ता प्रकल्पासाठी आवश्यक अशी खासगी जमीन वाटाघाटीने थेट खरेदीद्वारे संपादित करण्यात या व्यवहारावरील मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्क माफ करण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

नागपूर जिल्ह्यातील हिंगणा येथील मौजे गोदणी आणि मौजा लाडगाव येथे नवीन नागपूर अंतर्गत इंटरनॅशनल बिझनेस अँड फायनान्स सेंटर विकसित करण्यात येणार आहे. या प्रकल्पाची उभारणी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण करणार आहे. याचबरोबर नागपूर शहराभोवती १४८ किलोमीटरचा बाह्यवळण रस्ता आणि त्यालगत चार वाहतूक बेट (टर्मिनल्स) विकसित करण्यात येणार आहेत.

या दोन्ही प्रकल्पासाठी खासगी जमीन वाटाघाटीने खरेदी करावी लागणार आहे. त्यासाठी सुमारे ६३७ कोटी रुपयांचे मुद्रांक शुल्क आणि नोंदणी शुल्क भरावे लागणार आहे. हे दोन्ही प्रकल्प महत्वाकांक्षी आणि सार्वजनिक हिताचे आहे. यातून परिसराच्या विकासाला मोठी गती लाभणार आहे. अनेक उद्योग, व्यवसायांना संधी लाभणार आहे. त्याकरिता हे दोन्ही प्रकल्प वेळेत पूर्ण करावे लागणार आहेत. त्यासाठी मुद्रांक आणि नोंदणी शुल्क माफ केल्यास प्रकल्पाला आणखी गती मिळणार असल्याने हे शुल्क माफ करावे, अशी मागणी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने शासनाकडे केली होती.

# फिश वेंडिंग ई-रिक्षा योजनेमुळे मत्स्यविक्रीला नवे बळ; स्वच्छ व आधुनिक बाजारपेठ उपलब्ध होणार – मंत्री नितेश राणे

**मुंबई :** राज्यातील मत्स्यविक्री व्यवसाय अधिक स्वच्छ, आधुनिक आणि ग्राहकाभिमुख करण्याच्या दृष्टीने मत्स्यव्यवसाय विभागामार्फत "फिश वेंडिंग ई-रिक्षा" मॉडेल राबविण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव सादर करावा, या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना अनुदान देण्याबाबत शासन स्तरावर सकारात्मक विचार सुरू असल्याची माहिती मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी आज येथे दिली.

मंत्रालयात मत्स्यव्यवसाय विभागाच्या फिश वेंडिंग स्टॉल योजने अंतर्गत लाभार्थ्यांना ९०टक्के अनुदान देणेबाबत व ई- रिक्षा आधारीत मॉडेल राबविण्यासंदर्भात आयोजित बैठकीत श्री राणे बोलत होते. यावेळी आमदार उमेश उर्फ चंदू यावलकर, मत्स्यव्यवसाय आयुक्त प्रेरणा देशभ्रतार, मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थांचे प्रतिनिधी आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.



श्री राणे म्हणाले की, अमरावती जिल्ह्यात सध्या ८० नोंदणीकृत मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था कार्यरत असून, त्यामधील अंदाजे ५०० ते ७०० सक्रिय सभासद किरकोळ मासळी विक्री व्यवसायाशी जोडलेले आहेत. मात्र, जिल्ह्यातील बहुतांश मत्स्यविक्री बाजारपेठा अस्वच्छ आणि अपुऱ्या सुविधांनी ग्रस्त आहेत. यामुळे मासळीच्या गुणवत्तेवर परिणाम होत असून मच्छीमारांना योग्य बाजारभाव मिळण्यात अडचणी येत आहेत. याच पार्श्वभूमीवर मत्स्यव्यवसाय विभागाने "फिश वेंडिंग ई-रिक्षा" हे आधुनिक मॉडेल राबविण्याचा प्रस्ताव सादर करावा. विभागामार्फत आणि जिल्हा वार्षिक योजनेतून मदत देण्याचा प्रयत्न केला जाईल. या योजनेसाठी प्रति लाभार्थी अंदाजे ४ लाख रुपयांचा प्रकल्प खर्च प्रस्तावित करण्यात आला आहे.

"राज्यातील मच्छीमारांना पारंपरिक विक्री पद्धतीतून आधुनिक आणि स्वच्छ व्यवसाय मॉडेलकडे नेण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. फिश वेंडिंग ई-रिक्षा योजनेमुळे मत्स्यविक्री व्यवसायाला नवे स्वरूप मिळेल. ग्राहकांना दर्जेदार मासळी उपलब्ध होईल, तर मच्छीमारांचे उत्पन्न वाढण्यासही मोठी मदत होईल. ग्रामीण आणि शहरी भागात मत्स्यविक्रीची साखळी अधिक सक्षम करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, असेही श्री.राणे म्हणाले.

## बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीक विम्याची नुकसानभरपाई मिळण्यासाठी तातडीने निर्णय घ्या – कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

**मुंबई :** प्रधानमंत्री पीक विमा योजना अंतर्गत खरीप हंगाम २०२५ मधील बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळण्याबाबत बँका आणि विमा कंपन्यांसोबत तातडीने बैठक घेऊन योग्य निर्णय करण्यात यावेत, अशा स्पष्ट सूचना कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिल्या.



मंत्रालयात आयोजित बैठकीत प्रधानमंत्री पीक विमा योजना अंतर्गत बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम न मिळाल्याच्या प्रश्नावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी आमदार विजयसिंह पंडित, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, कृषी संचालक विनयकुमार आवटे तसेच शेतकरी प्रतिनिधी उपस्थित होते.

कृषिमंत्री भरणे म्हणाले की, खरीप हंगाम २०२५ पासून राज्यात सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना उत्पादन आधारित पद्धतीने आणि पीक कापणी प्रयोगांच्या आधारे राबविण्यात येत आहे. बीड जिल्ह्यात या योजनेची अंमलबजावणी आयसीआयसीआय लोम्बार्ड जनरल इन्श्युरन्स कंपनी लिमिटेडमार्फत करण्यात येत असून, पिकांच्या नुकसान भरपाईसाठी एसडीआरएफ आणि एनडीआरएफच्या निकषांनुसार कार्यवाही केली जाते.

शेतकऱ्यांना वेळेत आणि न्याय्य नुकसानभरपाई मिळणे अत्यंत महत्त्वाचे असून, संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्य करून प्रलंबित प्रश्न मार्गी लावावेत, असेही त्यांनी सांगितले.आमदार विजयसिंह पंडित यांनी केंद्र शासनाने पीक विम्यासंदर्भातील रद्द केलेले काही निकष पुन्हा विचारात घेऊन आवश्यक बदल करावेत, अशी मागणी यावेळी केली.

# शासकीय कर्मचाऱ्यांच्या २०२६ मधील सर्वसाधारण बदल्यांना मुदतवाढ

**मुंबई :** देशात सुरु असेल्या जनगणना २०२७ च्या पार्श्वभूमीवर राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या २०२६ मधील सर्वसाधारण बदल्यांना मुदतवाढ देण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. त्यानुसार आता शासनाला ३० जून २०२६ पर्यंत बदली प्रक्रिया राबविता येणार आहे. यासाठी महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे नियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे. त्याबाबतच्या मसुद्यासही मंजुरी देण्यात आली.शासकीय कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्या दरवर्षी एप्रिल-मे महिन्यात करण्यात येतात. मात्र देशात जनगणना २०२७ अंतर्गत पहिला टप्पा सुरु आहे. त्यामध्ये घरयादी तयार करणे व घरगणना हे काम १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ या कालावधीत करण्यात



येणार आहे. जनगणनेच्या कामासाठी नियुक्त कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात येऊ नये असे निर्देश केंद्र सरकारने दिले आहेत. त्यामुळे या कामासाठी नियुक्त करण्यात आलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या सर्वसाधारण बदल्यांना ३० जून २०२६ पर्यंत मुदतवाढ द्यावी लागणार आहे. त्यानुसार बदली संदर्भातील अधिनियमात मुदतवाढीबाबत सुधारणा करावी लागणार आहे. त्यानुसार या मुदतवाढीबाबतचा अध्यादेश राज्यपाल यांच्या मान्यतेने जाहीर करण्यास मान्यता देण्यात आली.

## पेसा क्षेत्रातील कृषी सेवक पदभरती प्रक्रिया गतीने पूर्ण करा – कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

**मुंबई :** राज्यातील पेसा क्षेत्रातील कृषी विभागातील रिक्त पदे तातडीने भरून कृषी सेवा अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक कार्यवाही वेगाने पूर्ण करावी, असे निर्देश कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले.



मंत्रालयात पेसा अंतर्गत कृषी सेवक पदभरती, रिक्त जागा भरणे आणि मानधन तत्त्वावरील कृषी सेवकांच्या नियमितीकरणासंदर्भात आयोजित बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार राजू तोडसाम, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह, कृषी आयुक्त सूरज मांढरे तसेच सर्व विभागीय कृषी संचालक ऑनलाइन माध्यमातून उपस्थित होते.

कृषिमंत्री भरणे म्हणाले की, राज्यातील १३ पेसायुक्त जिल्ह्यांमधील कृषी सहाय्यक व कृषी सेवक संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी बिंदूनामावलीची प्रक्रिया निर्धारित कालावधीत पूर्ण करण्यात यावी. शासनाच्या ११ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या निर्णयानुसार पदभरतीची कार्यवाही तातडीने सुरू करावी. तसेच मानधन तत्त्वावर कार्यरत कृषी सेवकांना कायमस्वरूपी नियुक्ती देण्यासाठी आवश्यक प्रस्ताव आणि प्रशासकीय प्रक्रिया गतीने पूर्ण कराव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मागासवर्गीय कक्ष, समाजकल्याण विभाग आणि सर्व विभागीय आयुक्तांनी पेसा अंतर्गत बिंदूनामावलीची तपासणी तातडीने पूर्ण करावी, असे निर्देशही त्यांनी दिले. माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी करत पेसा क्षेत्रातील भरती प्रक्रिया कोणत्याही विलंबाशिवाय पूर्ण करण्यावर शासनाचा भर असल्याचे कृषिमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

आमदार नारायण तोडसाम यांनी पेसा अंतर्गत कृषी सेवक पदभरती, रिक्त जागा भरणे आणि मानधन तत्त्वावरील कृषी सेवकांच्या नियमितीकरणासंदर्भात शासनाकडून गतीने कार्यवाही होणे गरजेचे असल्याचे बैठकीत सांगितले.

# विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी एनसीसी महत्त्वाचे – मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील

## राज्यातील एनसीसी प्रशिक्षणासाठी सर्व सुविधा उपलब्ध करून देणार

**मुंबई :** राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) ही विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासोबतच देशहिताची भावना निर्माण करणारी प्रभावी चळवळ असून राज्यातील एनसीसी प्रशिक्षणासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील, असे प्रतिपादन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले.

मंत्रालयात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील एनसीसी स्वयंसेवक, एनसीसी कॅडेट्स आणि प्रशिक्षण केंद्रांशी संबंधित विविध सुविधा, प्रशिक्षण व्यवस्था आणि नियोजन याबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव



वेणूगोपाल रेड्डी, तंत्र शिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेन्द्र देवळाणकर, एनएसएस विभागाचे संचालक मिलिंद काळे, एनसीसी संचालनालयाचे अतिरिक्त महासंचालक मेजर जनरल विवेक त्यागी, एनसीसी ग्रुपचे ग्रुप कॅप्टन के. डी. दीपक, कमांडर पी. सुदान, महाराष्ट्र नौदलचे मेजर ईशान कृष्णा तसेच एनसीसी गर्ल्स बटालियनचे अधिकारी उपस्थित होते.

मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, एनसीसी ही केवळ शैक्षणिक उपक्रमांची योजना नसून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, नेतृत्वगुण, शिस्त, राष्ट्रसेवा आणि संघटन कौशल्य विकसित करणारे महत्त्वपूर्ण माध्यम आहे. विद्यार्थ्यांचा प्रशिक्षणामध्ये अधिकाधिक सहभाग वाढण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक असून प्रशिक्षणाचे नियोजन अधिक प्रभावी आणि कालबद्ध पद्धतीने करण्यात यावे.

मुंबई आणि नागपूरसारख्या महानगरांमध्ये जागेच्या अडचणी असल्याचे निदर्शनास आले असून त्या तातडीने दूर करण्यासाठी क्रीडा व युवक कल्याण विभाग आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांची संयुक्त बैठक घेऊन एनसीसी प्रशिक्षणासाठी स्वतंत्र व सुसज्ज सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासनही मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले.

राज्यामध्ये एनसीसीसाठी प्रशिक्षण केंद्र उभारण्यासाठी जागेची उपलब्धता कशाप्रकारे करता येईल तसेच प्रशिक्षण केंद्रांना आवश्यक सोयी-सुविधा कशा पुरवता येतील, याबाबत एनसीसी अधिकाऱ्यांसोबत सविस्तर विचारविनिमय करण्यात आला.

राज्याच्या विकासात युवकांची भूमिका अत्यंत महत्वाची असून एनसीसीसारख्या उपक्रमांमधून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, नेतृत्व क्षमता, शिस्त आणि राष्ट्रभक्तीची भावना विकसित होत असल्याचे सांगत अशा योजनांना शासनाकडून अधिक बळ दिले जाईल, असेही मंत्री पाटील यांनी नमूद केले.

यावेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी युवकांसाठी सुरू केलेल्या प्रधानमंत्री इंटर्नशिप स्कीम (पीएमआयएस) अंतर्गत युवकांना अधिकाधिक सहभागी करून घेण्यासाठी आणि त्यांच्यासाठी उपलब्ध असलेल्या विविध संधींबाबतही सविस्तर चर्चा करण्यात आली.

# माथाडी कामगारांच्या हिताचे रक्षण करा – मंत्री आकाश फुंडकर

**मुंबई :** एसटी पार्सल सेवा देणाऱ्या कंत्राटदारांनी माथाडी कायद्याला अनुसरून कामगारांना त्यांचे सर्व कायदेशीर लाभ मिळवून दिले पाहिजेत. तसेच कायद्याप्रमाणे माथाडी कामगारांच्या हिताचे पूर्ण संरक्षण केले जावे, असे स्पष्ट निर्देश कामगार मंत्री ॲड.आकाश फुंडकर यांनी दिले.नरिमन भवन येथे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या अध्यक्षतेखाली माथाडी कामगारांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत बैठक पार पडली. बैठकीस कामगार विभागाच्या अपर मुख्य सचिव आय. ए. कुंदन, कामगार आयुक्त एच. पी. तुम्मोड, उपसचिव



स्वप्निल कापडणीस आदी उपस्थित होते. तसेच आमदार सदाभाऊ खोत यांनी दूरदृष्टी संवाद प्रणालीद्वारे बैठकीत सहभाग घेतला.

कामगार मंत्री फुंडकर म्हणाले, मे. ज्युबिलन्ट फूड वर्क प्रा. लिमिटेड या औद्योगिक आस्थापनाने स्थानिक भूमिपूत्र बेरोजगारांना रोजगाराची संधी दिली पाहिजे आणि तेथील माथाडी टोळीला तत्काळ मान्यता द्यावी. नवीन माथाडी कामगारांची नोंदणी करण्यासह पडताळणी करावी. या नवीन नोंदणीमध्ये स्थानिक भूमिपुत्रांनाच पहिले प्राधान्य देण्यात यावे.माथाडी कामगार आणि कंपन्यांमधील वादावर तोडगा काढण्यासाठी संबंधित सहाय्यक कामगार आयुक्त यांनी आपल्या स्तरावर औद्योगिक आस्थापना आणि माथाडी कामगार यांची संयुक्त बैठक आयोजित करावी.



**ठाणे महानगरपालिकेच्या विद्यमाने महापालिकेच्या कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात माजी पंतप्रधान 'पंडित जवाहरलाल नेहरु' यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी उपायुक्त जी.जी. गोदेपुरे, दीपक झिंजाड, प्र. उपमाहिती जनसंपर्क अधिकारी प्राची डिंगणकर, सुरक्षा अधिकारी घनश्याम फर्डे यांच्यासह महापालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.**